दैनिक
अन्यायाचा प्रतिकार
महाराष्ट्राचा बुलंद आवाज..
रायगड नगरी
मुख्य संपादक : सुनिल पोतदार
• वर्ष १५ वे • अंक ३५५ • MAHMAR/2006/17212 • रायगड • शनिवार दि.२० मार्च २०२१ • किंमत १ ₹ www.raigadnagari.com

राज्यातील सर्व खासगी कार्यालयं, आस्थापनांमध्ये ५० टक्के कर्मचाऱ्यांचीच उपस्थिती

दै.रायगड नगरी । मुंबई

कोविड रुग्णांचा महाराष्ट्रात पुन्हा झपाट्याने वाढणारा आकडा पाहता काही महत्त्वाचे निर्णय घेतले जाऊ लागले आहेत. याच धर्तीवर नुकतेच राज्य शासनाने कोविडचा वाढता प्रादुर्भाव पाहता मिशन बिगीन अंतर्गत राज्यातील सर्व खासगी कार्यालये आणि आस्थापनांमध्ये (आरोग्य, इतर अत्यावश्यक सेवा, आस्थापना तसेच मॅन्युफॅक्चरिंग क्षेत्र वगळून) इतर ठिकाणी ५० टक्के कर्मचारी उपस्थिती ठेवण्याबाबत आदेश निर्गमित केले आहेत.

सर्व शासकीय तसेच निमशासकीय कार्यालयांच्या विभाग आणि कार्यालय प्रमुखांनी कोविड परिस्थिती लक्षात घेऊन त्यांच्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांची उपस्थिती किती ठेवायची ते निश्चित करावे असेही या आदेशात म्हटले आहे.

नाट्यगृहे आणि सभागृहे यामधील उपस्थिती देखील ५० टक्के असावी तसेच त्यांचा उपयोग धार्मिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक मेळावे आणि सभा अशा इतर कारणांसाठी करता येणार नाही असेही या आदेशात नमूद करण्यात आले आहे. त्यामुळे कोरोना रुग्णांचा आकडा काहीसा कमी झाल्यामुळे कार्यालयांमध्ये काही अंशी सुरु झालेली कर्मचाऱ्यांची ये-जा येत्या काळात पुन्हा एकदा कमी किंवा ठप्प होण्याची चिन्हं नाकारता येत नाहीत. काही दिवसांपूर्वीच मुख्यमंत्र्यांनी राज्यातील कोरोना परिस्थितीचा आढावा घेत जनतेशी संवाद साधला होता. यावेळी त्यांनी वर्क फ्रॉम होम, या पर्यायाला प्राधान्य देण्यासाठी आग्रही सूर आळवल्याचं पाहायला मिळालं होतं.

नगरपरिषद/नगरपंचायत आस्थापनेवरील अनुकंपा तत्वावर नियुक्त्यांचा मार्ग खुला : ना.आदिती तटकरे

दै.रायगड नगरी । अलिबाग

रायगड जिल्हाधिकारी स्तरावर गट-क व गट-ड मधील पदाच्या प्रतिक्षा यादीनुसार नगरपरिषदा/नगरपंचायतीचे मुख्याधिकारी यांना अनुकंपा तत्वावरील नियुक्तीचे आदेश निर्गमित करण्याबाबत शासनाने मार्गदर्शन केले आहे. त्यामुळे प्रतिक्षा यादीनुसार प्रलंबित अनुकंपा तत्वावरील नियुक्त्यांचा मार्ग खुला झाला आहे.

जिल्हाधिकारी कार्यालयाकडील प्रतिक्षा यादीनुसार अनुकंपा तत्वावरील साधारणत: २७ प्रस्ताव नियुक्तीसाठी प्रलंबित आहेत. संबंधित पात्र उमेदवार व त्यांच्या पालकांनी याबाबत राज्यमंत्री तथा पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांची भेट घेऊन हा प्रश्न मार्गी लावण्याची विनंती केली होती. त्यानुसार पालकमंत्री कु.आदिती तटकरे या विषयाकडे वैयक्तिक लक्ष देऊन जिल्हाधिकारी कार्यालयास पुढील आवश्यक ती कार्यवाही तात्काळ करण्याचे निर्देश दिले. त्यानुसार जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत अनुकंपा तत्वावरील नियुक्तीबाबत नगरविकास विभागाकडे मार्गदर्शनासाठी पत्रव्यवहार करण्यात आला.

नगरविकास विभागाने दि.१८ मार्च २०२१ रोजी अनुकंपा तत्वावरील नियुक्तीसाठी संबंधित नगरपरिषद/नगरपंचायतीचे मुख्याधिकारी हे सक्षम नियुक्ती प्राधिकारी आहेत आणि जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत प्रतिक्षायादीमधील पात्र उमेदवारांची नावे निश्चित करुन रिक्त पद असलेल्या नगरपरिषद/नगरपंचायतीला कळविल्यानंतर संबंधित मुख्याधिकारी नियुक्तीचे आदेश जारी करतील, अशा सूचना निर्गमित केल्या आहेत.

यामुळे प्रतिक्षायादीवरील अनुकंपा तत्वावरील पात्र उमेदवारांस गट-क व गट-ड संवर्गातील पदावर लवकरात लवकर नोकरीत सामावून घेतल्यामुळे जिल्ह्यातील नगरपरिषद/नगरपंचायतींमधील अपुऱ्या मनुष्यबळाचा व पर्यायाने जनतेची कामे होण्याच्या दृष्टीने येणाऱ्या समस्यांचा प्रश्न सुटेल, असा विश्वास पालकमंत्री कु.आदिती तटकरे यांनी व्यक्त केला आहे.

एका घरात शिरले ३ चोर; एकाला पकडले दोघे फरार

दै.रायगड नगरी । गौसखान पठाण

सुधागड/पाली : सुधागड तालुक्यातील अतोणे आदिवासीडीवर एका घरात गुरुवारी (ता.१८) मध्यरात्री ३ चोर शिरले होते. यातील एका चोराला ग्रामस्थांनी पकडून पाली पोलिसांच्या ताब्यात दिले आहे. पाली पोलीस स्थानकात यासंदर्भात शुक्रवारी (ता.१९) सकाळी गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याबाबत पोलीस फिर्यादीवरून मिळालेल्या माहिती नुसार गुरुवारी (ता.१८) रात्री १ च्या सुमारास आदिवासी वाडीवरील गणेश हिलम यांच्या घरात दरवाजा उघडा असतांना ३ चोर चोरीच्या उद्देशाने शिरले होते. त्यांना पकडण्याचा प्रयत्न केला असता ते तेथून पळून गेले. त्यानंतर वाडीवर ग्रामस्थांनी शोध घेतल्यावर एक चोर सापडला. मात्र त्याचे इतर २ साथीदार फरार झाले आहेत. ..../२

संक्षिप्त...

मनसुख हिरण मृत्यू प्रकरणाचा तपास एनआयएकडे जाण्याची शक्यता

दै.रायगड नगरी । मुंबई

महाराष्ट्र दहशतवादी विरोधी पथकाकडे असलेल्या मनसुख हिरण या प्रकरणाचा तपास आता लवकरच एनआयएकडे जाणार आहे, अशी माहिती सूत्रांकडून मिळत आहे. या बद्दलची सर्व प्रक्रिया पूर्ण झाली आहे. एनआयए सध्या मुकेश अंबानी यांच्या निवासस्थानाबाहेर स्फोटकांची गाडी ठेवल्या प्रकरणाचा तपास करत आहे. तर मनसुख हिरण यांचा मृत्यूचा तपास महाराष्ट्र दहशतवाद विरोधी पथकाकडे आहे. मात्र, ही दोन्ही प्रकरणे एकमेकांशी संबंधित आहे. ज्यामुळे मनसुख हिरण मृत्यू प्रकरणाचा तपाससुद्धा एनआयएकडे जाणार असल्याची दाट शक्यता आहे.

मुकेश अंबानी यांच्या निवासस्थानाबाहेर स्फोटक प्रकरणाचा तपास आधी मुंबई पोलीस अधिकारी सचिन वाझे करत होते. मात्र, विधानसभेमध्ये या मुद्द्यावरून चांगलाच गदारोळ माजला तर या केसमधील महत्त्वाचा दुवा असलेले मनसुख हिरण यांचा मृतदेह मुंब्र्यातील खाडीत सापडल्यामुळे एकच खळबळ माजली आणि सरकारला विरोधकांनी कोंडीत धरलं. ज्यानंतर मनसुख हिरण यांच्या मृत्यू प्रकरणाचा तपास दहशतवादी पथकाकडे सोपवण्यात आला तर सचिन वाझे यांची क्राईम इंटेलिजन्स युनिट मधून उचलबांगडी करण्यात आली.

एनआयएने तपास हाती घेताच युद्ध पातळीवर याची तपासणी सुरू केली आणि सचिन वाझे यांना चौकशीसाठी बोलावलं. बारा तासांच्या चौकशीनंतर सचिन वाझे यांना एनआयएकडून अंबानी यांच्या घराबाहेर स्फोटक ठेवल्याप्रकरणी अटक करण्यात आली.

महानगरपालिकेमार्फत कोव्हिड १९ च्या घरोघरी करण्यात येणाऱ्या तपासण्या संशयास्पद ; नागरिकांचा आरोप

तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांनी दाखविला होता थायरोकेअर लॅबला हिसका

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल महानगरपालिकेने तुर्भे येथील नामांकित थायरोकेअर या पॅथॉलॉजी लॅबला कोव्हिड १९ च्या तपासण्या तसेच स्लॅब करण्याकरिता महापालिकेने नेमले होते. परंतु या लॅबच्या माध्यमातून घेण्यात आलेल्या कोव्हिड १९ तपासण्यांत अनेक नागरिक हे पॉझिटीव्ह दाखविण्यात येत होते. याबाबत काही नागरिकांना या लॅबबाबत संशय निर्माण झाल्याने त्यांनी प्रायव्हेट लॅबमध्ये स्वतःची टेस्ट पुन्हा करून घेतली असता ती निगेटीव्ह आल्याचे अनेक वेळा निष्पन्न झाले. त्यामुळे चुकीचे रिपोर्ट देण्यामागचे कारण काय? असा संभ्रम पनवेल महानगरपालिका हद्दीतील नागरिकांचा सदर लॅबबाबत निर्माण झाला होता. त्यामुळे वृत्तपत्रात सदर लॅबबाबत उहापोह झाल्याने तत्कालीन आयुक्त गणेश देशमुख यांनी सदर लॅबला दि.९/५/२०२० रोजीच्या कोव्हीड रुग्णांच्या प्रेसनोटमध्ये या लॅबच्या तपासणी अहवालाबाबत तफावत तसेच विलंब असल्याबाबत थायरोकेअर लॅब्रोटरी तुर्भे यांना महापालिका हद्दीतील रुग्णांच्या तपासण्या करण्यास मज्जाव करण्यात आला आहे असे नमूद केले होते.

या लॅबने के.डी.एम. महानगरपालिका हद्दीत काम सुरू केले तीथेही असाच धक्कादायक प्रकार उघडकिस आला एका वृध्दाने थायरोकेअर लॅब मध्ये स्वताची टेस्ट केल्यानंतर पॉझिटीव्ह रिपोर्ट आला. परंतु इसम तंदुरुस्त असल्याने रिपोर्ट बद्दल संशय आल्याने प्रायव्हेट लॅबमध्ये टेस्ट केली असता ती निगेटीव्ह आल्याचे वृत प्रकाशीत झाले होते. असाच प्रकार पनवेल महानगरपालिका हद्दीत आता महानगरपालिकेने पाचारण केलेल्या लॅब बद्दल होणार आहे का? सदर लॅब मधील कर्मचारी हे विविध सोसायटीत जाऊन टेस्ट करण्याकरीता जबरदस्ती करीत असल्याचा आरोप महानगरपालिका हद्दीतील काही नागरीक करीत आहेत. याबाबत निळकंठ गार्डन मधील रहिवाशी राकेश ठाकरे व दिलीप मजेठीया यांना महानगरपालिकेतून आलो आहे, आपल्या घरातील सर्वांची टेस्ट करायची आहे, असे सांगताच संबंधित व्यक्तींनी सांगितले की, आम्ही प्रायव्हेट टेस्ट करून घेवू असे लॅब लॅब कर्मचाऱ्यांना बजावले. तसेच या आलेल्या कर्मचाऱ्यांना आपण रिपोर्ट कधी देणार? त्याबाबत त्यांनी सांगितले की, आम्ही रिपोर्ट देत नाही, या कारणास्तव संबंधितांनी प्रायव्हेट टेस्ट करून घेतली असता बहुतांश नागरिकांचे रिपोर्ट हे निगेटीव्ह आल्याचे वरील व्यक्तींनी सांगितले.

याबाबत महानगरपालिका आयुक्त यांनी सदर लॅब मालकांना कडक सुचना करावी की सर्व सामान्य नागरीकांवर महानगरपालिकेने नेमलेल्याच लॅब मधुन टेस्ट करून घ्यावी हा अट्टाहास करू नये नागरीकांना स्वातंत्र्य देऊन काही लक्षणे असतील तरच टेस्ट करावी सरसकट घराघरांत टेस्ट करण्याची जोरजबरदस्ती करू नये हे मानवी हक्काच्या कायद्याचे हे उल्लंघन असल्याचे नागरिकांचे म्हणणे आहे.

धुतूम ग्रामपंचायतीचा मनमानी कारभार ; सरपंच व ग्रामसेवकावर विरोधकांचे शरसंधान

दै.रायगड नगरी । जीवन केणी

उरण : उरण तालुक्यातील श्रीमंत ग्रामपंचायत म्हणून ओळख असणाऱ्या धुतूम ग्रामपंचायतीमध्ये सध्या मनमानी कारभार सुरू आहे.ग्रामपंचायतीच्या सरपंच व ग्रामसेवक विरोधकांना विश्वासात न घेता हम करे सो कायदा या न्यायाने काम करीत असल्याचा गंभीर आरोप विरोधी पक्षातील चार सदस्यांनी पत्रकार परिषद घेऊन केला आहे. विकासकामांच्या नावाने लाखो रुपयांचा अपहार ग्रामपंचायतीच्या सरपंचांनी केला असल्याने त्याची उच्च स्तरीयचौकशी करण्याची मागणी या चार सदस्यांनी केली आहे.

नऊ सदस्य असणाऱ्या ग्रामपंचायतीवर सध्या शेकपची सत्ता आहे. ग्रामसेवक विनोद मोरे हे आपल्या मर्जीने ग्रामपंचायतीचा कारभार करीत असल्याचा गंभीर आरोप ग्रामविकास आघाडीचे सदस्य रविनाथ बाळाराम ठाकूर, अंगत लक्ष्मण ठाकूर, पूजा लक्ष्मण ठाकूर व निर्मला राजेश ठाकूर यांनी केला आहे.

आपल्या गलथान व भ्रष्टाचारी कारभाराने परिचित असलेले विनोद मोरे हे ग्रामसेवक विरोधी सदस्यांना ग्रामपंचायत मिटिंगचे प्रोसिडिंग न देणे, मिटिंग मध्ये पास न झालेले ठराव कामकाजात घुसविणे, न झालेल्या विकास कामांच्या नावाने ग्रामपंचायतीचा निधीचा अपहार करणे यासारखे प्रकार बिनधास्त पणे करीत असून त्याचा ..../२

पनवेल महानगरपालिका आयुक्त सुधाकर देशमुख यांनी घेतला कोविशिल्डचा दुसरा डोस

दै.रायगड नगरी । अलिबाग

येथील उपजिल्हा रुग्णालय पनवेल येथील विशेष लसीकरण कक्षात पनवेल महानगरपालिका आयुक्त सुधाकर देशमुख यांनी आज शुक्रवार, दि.१९ मार्च रोजी कोविशिल्ड लस चा दुसरा डोस घेतला.

यावेळी पनवेल महानगरपालिका उपायुक्त संजय शिंदे, वैद्यकीय आरोग्य अधिकारी पनवेल महानगरपालिका डॉ. आनंद गोसावी, प्रभारी वैद्यकीय अधीक्षक, पनवेल उपजिल्हा रुग्णालय डॉ.सचिन संकपाळ, पनवेल महानगरपालिकेचे वैद्यकीय अधिकारी डॉ.सुरेश पंडित, डॉ.नेहा गांगुर्डे, औषध निर्माण अधिकारी अनिल वायकर सहाय्यक मेट्रन ज्योती गुरव व इतर आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

एलॲण्डटी ठेकेदार कंपनीकडून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग सुरळीत ठेवण्यासाठी नडगांव मोरीच्या बांधकामातील तत्परता राजकीय नेत्यांना उपयुक्त

दुसऱ्या टप्प्याच्या अर्ध्या भागाचे काम मात्र रडतखडत

दै.रायगड नगरी । शैलेश पालकर

पोलादपूर : मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६च्या दुसऱ्या टप्प्याचे काम गेल्या वर्षभरात आतापर्यंतच्या सर्वात मंद गतीने सुरू असून कोरोना संसर्ग काळात झालेल्या निसर्ग वादळानंतर राजकीय नेतेगणांना तातडीने आपदग्रस्तांच्या भेटीला जाण्यासाठी महाड तालुक्यातील नडगांव मोरीच्या बांधकामाबाबत दर्जा व गुणवत्तेकडे दूर्लक्ष करून एलॲण्डटी ठेकेदार कंपनीकडून दाखविण्यात आलेली तत्परता आजतागायत पुन्हा पाहण्यास मिळालेली नाही.

कशेडी घाटातील धामणदिवी गावाजवळील दरवर्षी खचणारी मोरीमुळे आणि महाड ते पोलादपूर दरम्यान ज्याप्रमाणे सावित्री नदीवरील ब्रिटीश कालीन पुल कोसळल्याच्या दूर्घटनेनंतर रायगड जिल्हाधिकारी यांच्या आदेशाने महाड तालुक्यातील वीर आणि माणगांव तालुक्यातील लोणेरे येथून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक वळविण्याते येत असे. मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक कोकणाची लाईफलाईन ऐन कोरोना संसर्गकाळात बंद होण्याची नामुष्की महाड तालुक्यातील वीर ते पोलादपूर तालुक्यातील कातळीपर्यंतच्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६चे ठेकेदार असलेल्या एलॲण्डटी ..../२

लग्नाचे अमिष दाखवून महिलेची फसवणुक करणाऱ्या भामट्याचा पोलिसांकडून शोध सुरु

दै.रायगड नगरी । पनवेल

पनवेल भागात राहाणाऱ्या ३३ वर्षीय महिलेची, तिच्या पतीने फसवणुक केल्याने त्याला सोडून दुसऱ्या व्यक्तीसोबत घरोबा करण्याचे स्वप्न या महिलेने रंगविले होते. मात्र दुसऱ्या व्यक्तीने देखील या महिलेला लग्नाचे अमिष दाखवून तिच्याकडून १ लाख ५ हजार रुपये उकळून तिची फसवणुक केल्याचा प्रकार उघडकिस आला आहे. विकास झिरेकर (३६) असे या महिलेची फसवणूक करणाऱ्या व्यक्तीचे नाव असून एनआरआय पोलिसांनी त्याच्या विरोधात फसवणुकिचा गुन्हा दाखल करुन त्याचा शोध सुरु केला आहे.

या घटनेतील ३३ वर्षीय तक्रारदार विवाहित महिलेच्या पतीने, आपले पहिले लग्न झाल्याचे लपवून ठेवत तिच्यासोबत दुसरा विवाह करुन तिची फसवणुक केली होती. त्यामुळे या महिलेने काही वर्षापुर्वीच पतीला सोडून ती मुलीसह उदगीर येथे आपल्या आईच्या घरी राहाण्यास होती. त्यानंतर वर्षभरापासून ती घरकाम करुन पनवेल तालुक्यात मुलीसह राहात आहे. दरम्यान, पंढरपुर येथे राहणारा विकास झिरेकर याची पत्नी क्षय रोगामुळे आजारी असल्यामुळे तसेच त्याला दोन मुले असल्यामुळे तो देखील दुसऱ्या लग्नासाठी महिलेचा शोध घेत होता. डिसेंबर २०१८ मध्ये विकास झिरेकर हा पिडीत महिलेसोबत लग्नाची बोलणी करण्यासाठी तिच्या माहेरी उदगीर येथे गेला होता. त्यावेळी पिडीत महिलेने तिच्या मुलीसह सांभाळ करण्याची अट झिरेकर याला घातली होती. त्यावेळी झिरेकर याने तिच्यासह मुलीचा देखील सांभाळ करण्याचे तिला आश्वासन दिले होते.

त्यानंतर या दोघांनी लग्न करण्याचे निश्चित केल्यानंतर झिरेकर व पिडीत महिलेमध्ये मोबाईलवरुन नियमित संभाषण सुरु झाले. विकास झिरेकर हा पिडीत महिलेच्या मुलीसोबत बोलुन तिची विचारपुस करत होता. तर पिडीत महिला झिरेकर याच्या दोन्ही मुलांसोबत संवाद साधत होती. दरम्यान, जानेवारी २०१९ मध्ये विकास झिरेकर याने पिडीत महिलेला फोन करुन त्याला ट्रक घेण्यासाठी १ लाख रुपये कमी ..../२

अस्तनीतले ओसामा

एका उद्योगपतीच्या घराजवळ कथित स्फोटके भरलेली गाडी २५ फेब्रुवारी रोजी सकाळी सापडली. या गाडीचे मालक मनसुख हिरण यांचा मृतदेह मुंब्रा खाडीतून पाच मार्चला बाहेर काढण्यात आला. हे सगळे उपद्रयाप गुन्हेगारी टोळीचे किंवा संशयित दहशतवाद्यांचे नाहीत, हे स्पष्ट होऊनही बरेच दिवस झाले. त्यानंतर, मुंबई पोलिस आयुक्तांची साधी बदली करण्यासाठी महाराष्ट्र सरकारला १७ मार्चची वाट पाहावी लागली. आता महाराष्ट्राचे गृहमंत्री 'मुंबई पोलिसांकडून माफ न करता येण्याजोग्या चुका झाल्या आहेत,' याची जाहीर कबुली देत आहेत. गुन्ह्यांमधली गाडी पोलिस आयुक्तांच्या कार्यालयाच्या आवारात सापडणे, एका तिय्यम अधिकाऱ्याला खुनासारख्या गंभीर गुन्ह्यात अटक होणे आणि जिलेटीन भरलेल्या गाडीपासून पुढे सगळ्याच घटनाक्रमाचा तपास पारदर्शक आणि निष्पक्ष पद्धतीने न होणे, याला कोणताही सामान्य नागरिक 'अक्षम्य गुन्हा' म्हणेल. त्याला गृहमंत्री 'चुका' म्हणत आहेत. आणि या 'माफ न करता येण्याजोग्या' चुकांना शिक्षा काय? तर बदली! एक साधे उदाहरण घेऊया. समजा, उद्या एखाद्या नागरिकाच्या घराच्या आवारात 'संशयास्पद दहशती कारवाया तसेच संशयास्पद मृत्यू' यांच्याशी संबंधित असणारे वाहन सापडले तर त्या घराच्या मालकाला पोलिस आधी अटक करतील की त्याला नुसती समज देऊन सोडून देतील? मग पोलिस आयुक्तांच्या कार्यालयाच्या आवारात सापडलेल्या आणि गुन्ह्यांमध्ये वापर झालेल्या वाहनाची नैतिक जबाबदारी कोणाची? गंभीर गुन्ह्यांमध्ये वापरलेली गाडी या आवारात ठेवण्याची हिंमत 'गणवेशातील गुन्हेगारांना' होते, यावरून पोलिस दलाची किती आमूलाग्र साफसफाई करण्याची गरज आहे, हेच दिसून येते. दुर्दैवाने, तीन पक्षांचे हे आघाडी सरकार अशी राजकीय इच्छाशक्ती दाखवायला अजूनही तयार नाही. वरिष्ठ पोलिस अधिकाऱ्यांच्या बदल्या हे पाऊल निश्चितच पुरेसे नाही. मुंबई मुंबई पोलिसांच्या विश्वासार्हतेचा आणि प्रामाणिक व नेक अधिकाऱ्यांच्या कर्तव्यनिष्ठेचा जो अपमान या प्रकरणातून होतो आहे, तो निव्वळ बदल्यांनी भरून निघणारा नाही. मुंबईच्या नव्या आयुक्तांनी नागरिकांना दिलासा देणारी काही विधाने केली आहेत. 'अशा घटनांची पुनरावृत्ती होणार नाही, यासाठी आवश्यक त्या उपाययोजना केल्या जातील,' असे त्यांनी म्हटले आहे. या आश्वासनांचे स्वागत. मात्र, भविष्यात काही चांगले करावयाचे असेल तर आत्ता या प्रकरणाचा सोक्षमोक्ष लावण्यासाठी नव्या आयुक्तांनी तपास यंत्रणांना मोकळीक व नेतृत्व द्यावे. आज केंद्राच्या अखत्यारीतील 'राष्ट्रीय तपास यंत्रणा' (एनआयए) आणि राज्याचे 'दहशतवाद विरोधी पथक' (एटीएस) अशा दोन यंत्रणा हे प्रकरण हाताळत आहेत. उद्या मनसुख यांच्या हत्येचाही तपास एनआयएने आपल्याकडे घेतला तर तो महाराष्ट्राच्या यंत्रणांवरचा एकप्रकारे अविश्वास असेल. अशी वेळ का आली? सत्ताधारी नेत्यांनी एनआयएवर टीका करायची आणि विरोधकांनी एटीएसवर अविश्वास दाखवायचा, हा संतापजनक खेळ तर बरेच दिवस चालू आहे. मुंबईच्या पोलिस आयुक्तांनी जिलेटीन भरलेली गाडी सापडली, त्याच दिवशी स्वतंत्र पथक नेमून स्वत: ही केस पारदर्शक पद्धतीने हाताळली असती तर इतके 'डॅमेज'ही झाले नसते आणि मग 'डॅमेज कंट्रोल'ची धावाधावही टळली असती. तसे का झाले नाही, याचीही चौकशी योग्य त्या माध्यमातून व्हायला हवी. मुंबई १९९३ मध्ये झालेल्या पहिल्या साखळी बॉंबस्फोटांपासून जवळपास तीन दशके दहशती हल्ले, स्फोट, दंगली यांचा सामना करीत आहे. या सर्व प्रसंगी मुंबई पोलिसांनी अतुलनीय धैर्य आणि शौर्य बजावले. मुंबईतील टोळीयुद्धही बरेच आटोक्यात आणले. मात्र, या साऱ्या काळात मुंबई पोलिस दलातील काही अधिकारी, गुन्हेगारी टोळ्या, काही राजकीय नेते, धनाढ्य व्यावसायिक आणि भूमाफिया या साऱ्यांचे जे गूळपीठ जमले; त्यातून विकृत व भयंकर कारस्थाने रचून मुंबईत गुन्हे घडविले जात आहेत. कुणीही सत्तेवर असले तरीही ते होतच असतात. 'जिलेटीन'ची गाडी व नंतरची हत्या, हे अशा विकृत साखळीतले गुन्हे दिसतात. त्यांच्या मुळापर्यंत जाण्याची इच्छा इथल्या आणि दिल्लीतल्या राज्यकर्त्यांना आहे किंवा नाही, हे सांगता येत नाही. याचे कारण, एकीकडे गुन्हेगारीकरण आणि दुसरीकडे राजकियीकरण अशा दोन्ही आक्रमणांचा सामना मुंबईचे पोलिस दल गेली काही दशके वाढत्या प्रमाणात करीत आहे. मुंबईचे पोलिस आयुक्त आणि राज्याचे पोलिस महासंचालक यांनी हे आक्रमण मोडून काढण्याचे धैर्य दाखवायला हवे. तेच मुंबई व महाराष्ट्राच्या हिताचे आहे. एखादा तिय्यम दर्जाचा अधिकारी 'ओसामा बिन लादेन' आहे का, असा प्रश्न विचारणे सोपे आहे. मात्र, लादेनचे दहशतवादी घुसले तर त्या ज्ञात शत्रूंचा बीमोड तरी करता येतो. अस्तनीत जाऊन बसणारे असले ओसामा मालकासकट देशही बुडवणारे असतात.

हसळा तालुक्यातील जंगलात लागलेल्या वणव्याला जबाबदार कोण? वन विभागाचे दुर्लक्ष

दै.रायगड नगरी । म्हसळा

म्हसळा तालुक्यातील घुम, केलटे, पानवे, सांगवड परिसरात वणवे लागण्याचे प्रकार सरोजपणे सुरू असून त्यामुळे शेकडो एकर क्षेत्रावरील वनसंपदा जळून खाक झालेली आहे. तर येथील प्राण्यांना नाहक आपला जीव गमवावा लागला आहे.हा वणवा चुकून लागला नसून जाणून बुजून लावण्यात आला आहे.

यामध्ये ज्यांनी त्या भागातल्या जमिनी विकत घेतल्या आहेत त्यांच्यावर स्थानिक नागरिकांचा संशय आहे.या बाबत वनविभागाकडे तक्रार सुद्धा करण्यात आली आहे. एवढ्या भयावह वणव्याबद्दल वनविभाग सुस्त दिसत असून अद्याप एकही कारवाई करण्यात आली नसल्याने निसर्ग प्रेमींना तसेच स्थानिक नागरिकांचा वनविभागावर संताप अनावर झाला आहे.

दरवर्षी वनविभागाकडून लाखो रुपये खर्च करून वृक्ष लागवड केली जाते. मात्र वणव्यामुळे वृक्षांची होळी होऊन शासकीय निधीची ही राख होत आहे.तालुक्यात गावामध्ये संयुक्त वन व्यवस्थापन समिती स्थापन करण्यात आल्या आहेत.तरीही वणवे लागून अपरिमित हानी टाळण्यास वनविभागाला अपयश येत आहे.रात्रीच्या वेळी जंगलांना आगी लावण्याचे प्रकार होत असल्याने मुक्या जिवाना आगीच्या ज्वाळामध्ये होरपळावे लागत आहे.घरट्यातील पिल्ले व वनप्राण्यांची नवीन पिढी जळून खाक होत आहे.या मुक्या पक्षी प्राण्यांच्या जीवांचा जीव घेणाऱ्यावर खटले दाखल करण्याची मागणी पक्षी प्राणी प्रेमींकडून होत आहे.

मोठमोठ्या डोंगरांना लागणारे वणवे थांबवण्यासाठी वनविभागाने काहीतरी वेगळा उपक्रम हाती घेणे गरजेचे आहे. आगी लावणाऱ्यावर वनविभागाची दहशत बसावी म्हणून त्यांच्यावर कारवाई करणे जरुरीचे आहे.

कोशिश फाऊंडेशनच्यावतीने 'स्नॅपशॉटस फोटोग्राफी कॉम्पिटिशन २०२१' स्पर्धेचे आयोजन

दै.रायगड नगरी । पनवेल

कोशिश फाऊंडेशनच्यावतीने 'स्नॅपशॉटस फोटोग्राफी कॉम्पिटिशन २०२१' या स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

कॅमेरा फोटोग्राफी व मोबाईल फोटोग्राफी अशा दोन स्वरूपात व खुल्या गटात आणि पनवेल महानगरपालिका हद्द मर्यादित हि स्पर्धा होणार असून प्रगतीशील महिला, पाणी वाचवा, वन्यजीव, निसर्ग या चार विषयांवर आधारित आहे. या स्पर्धेतील एकूण विजेत्यांना ३० हजार रुपयांची पारितोषिके देण्यात येणार आहे.

फोटोग्राफ सादर करण्याची अंतिम तारीख २५ मार्च २०२१ असून स्पर्धेत सहभाग व अधिक माहितीसाठी ७७५७०००००० या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन आयोजकांनी केले असून या स्पर्धेत जास्तीत जास्त स्पर्धकांनी सहभाग घ्यावा, असे आवाहन कोशिश फाऊंडेशनचे अध्यक्ष व पनवेल महानगरपालिकेचे सभागृहनेते परेश ठाकूर यांनी केले आहे.

वडिलांच्या प्रथम स्मृतीदिनाचे औचित्य साधून केला शेतकऱ्यांचा सन्मान

दै.रायगड नगरी । तळा

तळा शहरातील राणेची वाडी (गोळे आळी) येथील गोळे बंधूंनी आपल्या वडिलांच्या प्रथम पुण्यस्मरणाचे औचित्य साधून तालुक्यातील प्रगत आदिवासी शेतकऱ्यांचा सन्मान तसेशेतकऱ्यांना शेतीच्या अवजारांचे वाटप केले.पंचमुखीमारुती मंदिरा समोर कै.नारायण भिकु गोळे यांच्या प्रथम पुण्य स्मरणाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

या प्रसंगी माजी नगराध्यक्षा रेश्मा मुंढे, कृषि अधिकारी सागर वाडकर, रितेश मुंढे, अमेय लोखंडे, स्वदेश फाउंडेशन व बळीराजा संघटनेचे सदस्य तसेच तालुक्यातील आदिवासी महिला व बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.कै.नारायण गोळे हे हाडाचे शेतकरी होते. आपल्या मुलांनी चांगले शिक्षण घेऊन नोकरी करावी अथवा मोठ्या पदापर्यंत पोहचून नाव मोठे करावे असे प्रत्येक आई वडिलांचे स्वप्न असते. परंतु नारायण गोळे यांनी आपल्या मुलांनी प्रगत शेतकरी व्हावे म्हणून प्रामाणिक प्रयत्न केले.

हल्लीच्या युगात हातभर जागेसाठी देखीलभांडण होतअसल्याचे आपण नेहमी पाहतो मात्र नारायण गोळे यांनी पंचमुखी मारुती मंदिरासाठी स्वतःची जागा दान स्वरूपात दिली. त्यांच्या पश्चात त्यांची परंपरा त्यांच्या तिन्ही मुलांनी सुरू ठेवली आहे. वडिलांच्या प्रथम पुण्यस्मरणास सुरेखा पवार (शेनाटे आदिवासी वाडी), वसंत जाधव(वांजळोशी आदिवासी वाडी), गोपाळ हिलम(चरई आदिवासी वाडी) या तिन्ही प्रगतशील शेतकऱ्यांचा सन्मान केला.

तसेच शेणाटे, वांजळोशी, चरई, कडक्याची गाणी, खांबविली, आंबेळी आदी आदिवासी वाड्यांतील शेतकरी बांधवांना घमेल, फावडे, पिकाव यांसारख्या शेतीच्या अवजारांचे वाटप करण्यात आले. हा मोठा आदर्श समाजापुढे ठेवला असून इतरांनीही आशा प्रकारचे उपक्रम राबविण्याचेसंदेश या माध्यमातून दिला आहे त्यांनी केले. गोळे बंधूंनी राबविलेल्या या संकल्पनेचे सर्वत्र कौतुक करण्यात येत आहे.

वाचकांना विनम्र सूचना

दै.रायगड नगरी वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींतील मजकूराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची दै.रायगड नगरी कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पुर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल दै.रायगड नगरी वृत्तपत्राचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

दैनिक रायगड नगरी
जाहिरातीचे उत्तम
या वृत्तपत्रात व्यावसायिक, शैक्षणिक जाहिराती तसेच वारस दाखला, नावात बदल, मिळकत खरेदी-विक्री, सहकारी संस्था, तसेच बक्षिसपत्र बाबतच्या नोटीस प्रसिद्ध करण्यासाठी संपर्क करा.
Publish Your Public Notice, Tender Notice, Property, Missing Documents, Change of Name ads. in 'Dainik Raigad Nagari'
For Booking....
Call / Whatsapp : 9619737911 / 9619979706
Off : 12, Radha Hari Niwas Complex, Opp.old Ratan talkies, Tilak Road, Panvel. Ph : 022-27469434
Web : www.raigadnagari.com / Email : raigad.nagari@gmail.com

ए/२ अंतर्गत कामांची मर्यादा १५ लाखापर्यंत करण्यात यावी

स्थानिक प्रकल्पग्रस्त ठेकेदार सामाजिक संस्था खारघर विभागची मागणी

दै.रायगड नगरी । पनवेल

सिडको खारघर-ओवे विभाग स्थानिक प्रकल्पग्रस्त ठेकेदार सामाजिक संघटनेच्या बैठकीमध्ये स्थानिक प्रकल्पग्रस्तांना ए/२ अंतर्गत कामांची मर्यादा १५ लाखापर्यंत करण्यात यावी, अशा मागणीचे निवेदन परिक्षक अभियंता खारघर सिडको अभियंता यांना संघटनेचे अध्यक्ष भरत पाटील यांनी दिले.

स्थानिक प्रकल्पग्रस्तांना ए/२ अंतर्गत कामांची मर्यादा १५ लाखापर्यंत करण्यात यावी. तसेच या कामांचे कोटेशन नोटीस बोर्डावर न लावता अनुभवी स्थानिक प्रकल्पग्रस्त ठेकेदारांना समप्रमणात कामांचे वाटप करून देण्यात यावे. खारघर-ओवे परिसरातील प्रामुख्याने खारघर, कोपरा, बेलपाडा, मुर्बी, ओवे, पेठ, रांजणपाडा, खुटुक बांधण, इनामपुरी या गावातील स्थानिक प्रकल्पग्रस्त ठेकेदारांच्या व्यतिरिक्त बाहेरच्या ठेकेदारांना खारघर नोडमध्ये ए/२ योनजेंतर्गत कामे देण्यात येवू नयेत. तसेच मागील आर्थिक वर्षात पावसाळ्यापूर्वीची कामे ज्या स्थानिक प्रकल्पग्रस्त एजन्सीला देण्यात आली होती. त्याच एजन्सीला संधी देण्यात यावी, अशी माफक मागणी प्रकल्पग्रस्तांच्या बैठकीत करण्यात आली. प्रकल्पग्रस्तांना दिलेल्या आश्वासनांची पुर्तता न झाल्यामुळे भविष्यात अडीअडचणी बाबत चर्चा करून कायमस्वरुपी प्रकल्पग्रस्तांना न्याय मिळावा म्हणून खारघर सिडको विभागातील संबंधित अधिकारी व स्थानिक प्रकल्पग्रस्त ठेकेदार यांची समन्वय बैठक बोलाविण्यात येवून योग्य ते मार्गदर्शन व्हावे यासाठी स्थानिक प्रकल्पग्रस्त ठेकेदार सामाजिक संस्था खारघर विभाग अध्यक्ष भरत पाटील यांनी अधिक्षक अभियंता खारघर सिडको विभाग यांना दिलेल्या निवेदनात केली आहे.

पनवेल महानगरपालिका
जाहीर नोटीस सूचना

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जनत अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेवून उक्त अधिनियम कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहीर करण्यात येते की,

अ.क्र.	अर्जदाराचे नाव व पत्ता	झाडांचा प्रकार व संख्या	झाडे तोडण्याचे कारण
१	एम.एस.कस्तुरी डेव्हलपर्स प्रो.भगवानजी धरमशी मिनात, प्लॉट नं.एफ ९४ आणि एफ ९५, सेक्टर १२, खारघर	३ जंगली झाडे	पनवेल महानगरपालिका हद्दीतील एम.एस. कस्तुरी डेव्हलपर्स प्रो.भगवानजी धरमशी मिनात, प्लॉट नं.एफ ९४ आणि एफ ९५, सेक्टर १२, खारघर येथील एकूण ०५ झाडे आहेत त्यापैकी ०३ जंगली झाडे ही भविष्यात सदर प्लॉटमध्ये अग्नीशमन दलाची गाडी फिरण्यास अडथळा निर्माण करू शकते. तरी ०३ जंगली झाडे तोडणेकामी परवानगी मिळणेबाबत.

सदर प्रस्तावास वृक्ष तोडण्याची परवानगी देण्याचा वृक्ष प्राधिकरणाचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या ककाही हरकती अगर सूचना असल्यास ही सूचना प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत लेखी स्वरुपात पनवेल महानगरपालिकेच्या वृक्ष प्राधिकरण विभागामध्ये सादर कराव्यात. विहित मुदतीत सादर न झालेल्या हरकती अगर सूचनेचा विचार करण्यात येणार नाही याची नोंद घ्यावी.

सही/-
सहा.आयुक्त
तथा
वृक्ष अधिकारी
पनवेल महानगरपालिका

जा.क्र.पमपा/वृ.प्रा./१४६/२०२१
दिनांक : १९/०३/२०२१

पृष्ठ क्र.१ वरुन...

एका घरात शिरले ३ चोर; एकाला पकडले दोघे फरार

मौसावर अली मोहम्मद शरीफ शहा रा. शिवाजी नगर खडी मशीन रोड फकरुद्दीन शहा बाबा दर्ग्याच्या बाजूला मुंब्रा, जि. ठाणे. मूळ रा. एमडी शरीफ शहा काझी तोला तरवारा सीवान, राज्य - बिहार. असे या सापडलेल्या चोराचे नाव आहे. त्याच्यासह त्याच्या २ अनोळखी साथीदारांविरोधात पाली पोलीस स्थानकात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या गुन्ह्याचा पुढील तपास पोलीस निरीक्षक विजय तायडे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस नाईक ए. आर. शिर्के करीत आहेत.

धुतूम ग्रामपंचायतीचा मनमानी कारभार

जाब विचारणाऱ्याला माझ्यावर काहीही कारवाई करा माझे कोणी वाकडे करू शकत नसल्याची मखलाशी विनोद मोरे करीत असल्याचे या चार सदस्यांनी स्पष्ट केले आहे.

धुतूम ग्रामपंचायतीला वर्षाला सुमारे ९० लाखांचा कर मिळत असून या निधीचा परस्पर अपहार ग्रामसेवक व सरपंच करीत असल्याचा आरोप सदस्यांनी केला आहे. गावात अनेक विकास कामे ही फक्त कागदावर दाखवून त्या विकासकामांच्या नावाने रक्कम खर्च केल्याचे दिसून येत आहे. गावातील अनेक रस्त्यावर एकाचवेळी दोन दोन बिले मंजूर करून त्याचा पैसा ग्रामसेवक व सरपंचांनी हडप केला असल्याने ग्रामसेवक विनोद मोरे याची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी या चार सदस्यांनी केली आहे.

या कारभाराची तक्रार उरण पंचायत समितीच्या गटविकास अधिकारी व ग्रामविस्तार अधिकाऱ्यांकडे करूनही ते ग्रामसेवक विनोद मोरे यांना पाठीशी घालीत असून ग्रामपंचायती मधिल भ्रष्टाचाराला या दोन्ही अधिकाऱ्यांचा आशिर्वाद असल्याचे दिसून येत असल्याचे या सदस्यांनी पत्रकार परिषदेत नमूद केले आहे.धुतूम ग्रामपंचायतीच्या घनकचरा प्रकल्पावर सुमारे चाळीस लाखांचा निधी खर्च केला असून हा घनकचरा प्रकल्प अवघ्या काही दिवसात बंद होऊन आज तो भंगारावस्थेत आहे.याची चौकशी होऊन या प्रकल्पावर खर्च झालेला पैसा ग्रामसेवक व सरपंचाकडून वसूल करावा अशी मागणी विरोधी सदस्यांनी केली आहे.

राजकीय नेत्यांना उपयुक्त

कंपनीकडून योग्य नियोजनाअभावी झाली होती. यामुळे महामार्गावरील वाहतूक लोणेरे आणि वीर मार्गे कोकणाशी संपर्कात सुरू करण्यात आली होती. अशातच, निसर्ग वादळाने कोकण किनारपट्टीवर थैमान घातले असताना राजकीय नेत्यांचे दौरे सुरळीत होण्यासाठी एलॲण्डटी कंपनीकडून केवळ दोन-चार दिवसात नडगांव येथील मोरीचे बांधकाम दर्जा आणि गुणवत्ता नियंत्रणाकडे कानाडोळा करीत युध्दपातळीवर करण्यात आले होते.

कोरोना संसर्ग काळात जवळ जवळ ८० टक्के कामगारांना त्यांच्या परराज्यातील गावांकडे रवाना करून चौपदरीकरणाचे काम ठप्प करणाऱ्या एलॲण्डटी कंपनीकडून आजतागायत दर्जा व गुणवत्ता नियंत्रणाकडे दूर्लक्ष करीत महाआघाडी सरकारचे मार्गदर्शक तसेच राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते खा. शरदश्चंद्र पवार यांच्या दौऱ्यासाठी चार दिवस आधीपासून सर्वसामान्य जनतेसाठी नादुरूस्त असलेला तसेच एकेरी वाहतूक ठेवण्यात आलेल्या तात्पुरत्या रस्त्यालगतची मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील नडगांव येथील मोरीचे बांधकाम सुरू करण्याचे नियोजन बांधकामासंदर्भातील कोणत्याही निकषांशिवाय करण्यात आले. यावेळी मोरीच्या ॲप्रोच रोडचा भराव तातडीने करून आणि मोरीचा स्लॅब टाकण्यासाठी लावलेला लोखंडी सांगाड्याचा टेकू न काढताच स्लॅबवरील वाहतूक सुरू करण्यात आली होती. यादरम्यान, महाराष्ट्रातील अनेक राजकीय नेतेही या नडगांव येथील मोरीवरून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग पार करून निसर्ग वादळग्रस्तांच्या भेटीला गेले. राजकीय व्यक्तींचा प्रवास सुरळीत पार होण्यासाठी एलॲण्डटी कंपनीकडून निकषांची पायमल्ली करून झालेले हे प्रयत्न यानंतरही दर्जा आणि गुणवत्तेच्या निकषांची पायमल्ली करून आजतागायत सुरू आहेत.

मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गाच्या काँक्रीटीकरणाखेरिज अन्य रस्त्यांसाठी केलेले डांबरीकरण हे अनेकठिकाणी अतिशय खड्डे आणि उंचवट्यांनी प्रवासास असह्य झाले आहे. रस्त्यालगतची गटारे बांधताना त्या गटारांवरील स्लॅब अनेक ठिकाणी महामार्गावरील धूळ नियंत्रणासाठी पाणी मारणाऱ्या टँकर्सचे टायर रूतून बसण्याइतपत निकृष्ट दर्जाचे झाले आहेत. मात्र, राष्ट्रीय महामार्ग बांधकाम विभागाने वेळोवेळी या कामाकडे अर्थपूर्ण दूर्लक्ष करीत एलॲण्डटी कंपनीला सर्वच बाबतीत मोकळीक दिली आहे. महामार्ग बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता बांगर यांनी या दुसऱ्या टप्प्यातील महाड तालुक्यातील वीर ते पोलादपूर तालुक्यातील कातळीपर्यंतच्या मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्ग क्र.६६चे ठेकेदार असलेल्या एलॲण्डटी कंपनीच्या कामावर पुर्णपणे दूर्लक्ष केल्याने आगामी पावसाळ्यामध्ये ठिकठिकाणी काँक्रीटीकरणालगतचा मातीचा भराव खचण्याचे तसेच काँक्रीटचे स्लॅब तडकण्याचे प्रकार वाढणार आहेत. परिणामी, महाड आणि पोलादपूर तालुक्यांना टाळून मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील वाहतूक परस्पर महाड तालुक्यातील वीर फाट्यावरून विन्हेरे ते तुळशीखिंडमार्गे कमकुवत रस्त्यावरून करावी लागणार आहे. आगामी पावसाळ्याला दोन महिन्यांचा अवधी शिल्लक असताना महामार्ग बांधकाम विभागाने एलॲण्डटी ठेकेदार कंपनीच्या कामावर विशेष लक्ष ठेवण्याची गरज निर्माण झाली आहे.

भामट्याचा पोलिसांकडून शोध सुरु

पडत असल्याचे सांगून तिच्याकडे १ लाख रुपयांची मागणी केली होती. यावेळी पिडीत महिलेने विकास झिरेकर याच्या बोलण्यावर विश्वास ठेवून त्याला ट्रक घेण्यासाठी १ लाख रुपये व खर्चासाठी ५ हजार रुपये त्याला पाठवून दिले होते. त्यानंतर विकास झिरेकर हा पिडीत महिलेसोबत फोनवरुन संपर्कात होता. मात्र पिडीत महिलेने आपल्या पैशांचा विषय काढल्यानंतर तो टाळाटाळ करायचा. अशाच पद्धतीने विकास झिरेकर याने अनेक महिने टाळाटाळ केली. त्यानंतर त्याने पिडीत महिलेचे फोन घेणे सुद्धा बंद केले. कालांतराने त्याने पिडीत महिलेचा फोन ब्लाक करुन टाकला. त्यानंतर विकास झिरेकर याने फसवणुक केल्याचे पिडीत महिलेच्या लक्षात आले. त्यानंतर तिने एनआरआय पोलीस ठाणे गाठून तक्रार दाखल केली. त्यानुसार पोलिसांनी विकास झिरेकर याच्यावर फसवणुकिचा गुन्हा दाखल करुन तिचा शोध सुरु केला आहे.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक, मुख्य संपादकः **सुनील कृष्णाजी पोतदार** यांनी सिद्धकला प्रिंट मिडीया ॲण्ड पब्लिकेशन्स प्रा.लि., प्लॉट नं.डब्ल्यू-२३०, टी.टी.सी.इंडस्ट्रीयल एरिया, एमआयडीसी, ठाणे बेलापूर रोड, कोपरखैरणे, नवी मुंबई-४००७१० येथे छापून १२, राधा हरी निवास कॉम्प्लेक्स, टिळक रोड, रामदास मंदिरासमोर पनवेल-४१०२०६, रायगड येथून प्रकाशित केले. दूरध्वनी (०२२) २७४६९४३४, फॅक्स-२७४६७६१७ **संपादक : राकेश दिलीप पितळे** R.N.I.Reg.No.MAHMAR/2006/17212 या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. (न्यायकक्षा-पनवेल) Email : raigad.nagari@gmail.com/ raigad.nagari@yahoo.com/ raigad.nagari@rediffmail.com

संक्षिप्त...

ओबीसी संघर्ष समितीच्या धाटाव विभागाच्या अध्यक्षपदी अमित मोहिते

दै.रायगड नगरी । गोवे-कोलाड

ओबीसी संघर्ष समन्वय समिती, ओबीसी जनमोर्चा संलग्न महाराष्ट्रच्या रोहा तालुक्यातील धाटाव विभागाची बैठक ओबीसी संघर्ष समन्वय समिती रोहा तालुका अध्यक्ष सुरेश मगर यांच्या अध्यक्षतेखाली व रायगड जिल्हा कार्यकारणी सदस्य मधुकर पाटील यांच्या उपस्थितीत रोहा शासकीय विश्रामगृह येथे पार पडली. या बैठकीत धाटाव विभागाच्या अध्यक्षपदी अमित मोहिते यांची तर सरचिटणीस पदी लक्ष्मण मोरे यांची बिनविरोध निवड करण्यात आली.

या बैठकीस रोहा तालुका सरचिटणीस महादेव सरसंबे, चिटणीस महेश बामुगडे,अरविंद मगर,चंद्रकांत भगत, आदी मान्यवर उपस्थित होते. यावेळी सुरेश मगर यांनी ओबीसी समाजाच्या विविध मागण्या व कार्यपद्धती यासंदर्भात माहिती दिली तर मधुकर पाटील यांनी ओबीसी समाजाने संघटित होऊन काम करण्याची गरज असल्याचे सांगितले.

या बैठकीत घाटाव विभाग संघर्ष समन्वय समिती ची कार्यकारिणी निवडण्यात आली. या कार्यकारणी निवड चे निरीक्षक म्हणून महादेव सरसंबे यांनी काम पाहिले. नूतन जाहीर झालेल्या या कार्यकरणी मध्ये अध्यक्ष अमित मोहिते, उपाध्यक्ष रमेश रावकर, रामाशेठ म्हात्रे, लक्ष्मण जंगम, संदेश मोरे, सरचिटणीस लक्ष्मण मोरे, खजिनदार हरिचंद्र मोरे, सहचिटणीस किशोर रटाटे, अनिल बामुगडे, राजू सुतार, विलास भगत, राकेश गुरव, सल्लागार लील-ाधर पांडूरंग मोरे, अनिल भगत, विष्णू लोखंडे, ज्ञानेश्वर साळुंखे, दत्ता चव्हाण, यशवंत रटाटे, सदानंद पडवळ, हरिश्चंद्र माने, रमेश हरी मोरे, रमेश विठ्ठल मोरे, अमित घाग, कार्यकारणी सदस्य सतीश भगत, जयवंत घरत, चंद्रकांत भगत, मयूर मुंढे, प्रशांत बर्डे, सचिन पवार, गणेश रटाटे, नरेश कोकरे, तुकाराम भगत आदींची निवड करण्यात आली आहे

सोन्याची पालखी नि रुप्याचं ठसं, यंदा शिमगोत्सवाच होणार कसं! पहिले पिलु लागले

दै.रायगड नगरी । रवींद्र कुवेसकर

उतेखोल/माणगाव : २०२१ मार्चचा पंधरवडा संपला आणि गुरुवार १८ मार्च पासूनच शिमगोत्सव सुरु झाला होळीचे पहिले पिलू ला-गले, आता सलग नऊ पिलं नऊ दिवस म्हणजेच नऊ माळा, रात्री नऊ नंतर छोटे छोटे होम ला-वले जाणार आहेत. नवव्या दिवशी चोर हळकुंड व शेवटच्या दहाव्या दिवशी म्हणजे सोमवारी २८ मार्च पौर्णिमेला मोठ्या होळी भोवती प्रार्थना पूर्वक सोन्याची पालखी नि रुप्याचं ठसं, या..या पालखीन कोन देव बसं, अस म्हणत, या..या पालखीन होम देव बसं चा गजर करीत ग्रामस्थ होळी भोवती गोलगोल फेर धरतात, हा रोमांचक अनुभव चाकरमान्यांना खुणावतो त्यांना आपल्या गावाकडे जाण्याची ओढ लागते. परंतु यंदा कोरोना विषाणूच्या दुसऱ्या लाटेची चिन्ह दिसू लागल्याने शिमगोत्सवाच होणार कसं ! असा प्रश्न सर्वांसमोर उभा ठाकला आहे.

गावकऱ्यांचा उत्साह दांडगा असला तरी यंदा सर्वत्रच होळी साजरी करताना कोरोनाचे भय आहे. जरा सावधानतेनेच जबाबदारीने खबरदारी घेत होळीचा सण साजरा करुयात अस अनेकांच मत आहे. नंतर कोरोना संसर्गाने पश्चातापाची पाळी येऊ नये.

पुन्हा एकदा कोविड-१९ विषाणूच्या प्रादूर्भावामुळे उद्भवलेली परस्थिती विच-ारात घेता, जिल्हाधिकारी निधी चौधरी यांनी उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याचे प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. सर्व प्रकारचे राजकीय, सामाजिक, सांस्कृतिक, करमणूक, धार्मिक बाबी इ. निगडीत कार्यक्रम, समारंभ, सण, उत्सव, ऊरुस, जत्रा, मिरवणूक, मेळावे, सभा, आंदोलने इ. यांचे आयोजन करण्यास मनाई राहील व याचे उल्लंघन केल्यास आपत्ती व्यवस्थापन कायद्याखाली जागेचे / मालमत्तेचे मालक हे दंडात्मक कारवाईस पात्र राहतील. हे आदेश दि. ३१ मार्च २०२१ पर्यंत लागू राहतील. या आदेशाची अंमल बजावणी सर्व आस्थापनांमार्फत/नागरिकांमार्फत काटेकोरपणे करण्याचे दृष्टीने आवश्यक नियोजन जिल्ह्यातील सर्व शासकीय यंत्रणांनी करावे. तसेच या आदे-शाचे उल्लंघन करणारी व्यक्ती भारतीय दंड विधान संहिता कलम १८८, २६९, २७०, २७१ तसेच आपत्ती व्यवस्थापन कायदा २००५ च्या कलम ५१ सह अन्य तरतूदीनुसार फौजदारी शिक्षेस पात्र राहतील असे जिल्हाधिकारी यांनी सूचित केले आहे.

उतेखोल येथील वाकडाई देवीच्या नयनरम्य मंदिरा पासून एक किलोमिटर अंतरावर असलेल्या देवीची सहान म्हणजे दगडी आसना जवळील होळीच्या माळावर यंदा येथील लहानथोर मंडळींची छोट्या आकाराची होळी लावण्यास सुरुवात झाली आहे. फोक वाजवीले जाताहेत. त्यांचा उत्साह ओसंडून वाहत आहे. मोठ्या होळीच्या आदल्या दिवशी रात्री चोर हळकुंडाला उतेखोलगांव व उतेखोल वाडी येथील ग्रामस्थ मुख्य होळीच्या तयारीला लागतात. हल्ली चोर हळकुंडाला ही शक्यतो लाकूड चोरी, वृक्षतोड होत नाही.

लोक स्वेच्छेन पेंडा, लाकडे देतात. यंदा होळीच्या माळावर ज्या ठिकाणी होळीचा मनोरा रचतात तिथे सुशोभिकरण व पेवर ब्लॉक बसविण्याचे काम सुरु आहे. त्याठिकाणी गोल कठडा बांधण्यात आला आहे येथेच अंदाजे १० ते १५ मिटर व्यासाची होळीची सुंदर रचना करुन मध्यभागी सावरीचे लाकुड उभे करुन लाकडे, पेंडा गवताचा सुमारे वीस फूट उंचीचा मनोरा होळी रचतात. गावातील महीला होळीची मनोभावे पुजा करतात होळीला पुरणपोळीचा नैवैद्य दाखवितात.

दरवर्षी होळीला रात्री असंख्य माणगांवकर होळीचे दर्शन व होळीत नारळ टाकण्या साठी या ठिकाणी गोळा होतात. दरवर्षी होळीचा माळ माणसांनी फूलून जातो, तरुणांचा उत्साह पाहण्याजोगा असतो. माळावर असलेला गोल-गरगरीत आकाराचा मोठाला वजनी दगड, ओणवे होऊन उचलून खांद्यावरुन पाठीमागे टाकण्याची तरुणांमध्ये शर्यत लागते. यामधुन आपल्या ताकदीचे प्रदर्शन घडविले जाते. रात्री होळी लागताच ग्रामदैवत वाकडाई देवीला पालखीत बसवून वाजत गाजत या माळावर आणली जाते. देवी येथे असलेल्या छोट्या मंदिरातील सहाणेवर मोठ्या उत्साहात विराजमान होते. तिथप-ासून पुढील पाच दिवस देवीच्या दर्शनासाठी भाविकांची रिघ लागते. नवसाला पावणाऱ्या या श्री वाकडाईचे महत्व या दिवसात अनन्यसाधारण असते.

अशातच धुळवडीसाठीचा पारध करण्याचा बेत पूर्वी आखला जायचा, गावातील तरुणमंडळी मोठ्या हिम्मतीने पारधीमध्ये सामील व्हायची परंतु अलिकडे शिकारीला बंदी असल्याने, मानवाच्या अतिक्रमणाने जंगले नष्ट झाल्याने, पारधीला जाण्या ऐवजी विकतच आणुन मांसाहार तिखटाचा प्रसाद म्हणुन ग्रामस्थ होळीच्या माळावर एकत्र जेवतात. याच सणात शिमग्याची सोंग काढली जातात. या सणात सर्व घराघरात आनंदाला पारावार उरत नाही. होळीच्या या विविध रंगी रुपाने आकर्षित झालेल्या ग्रामस्थ, चाकरमान्यांची पावले उत्साहाने गावाकडे का वळतात याचे नवल वाटू नये म्हणुनच म्हणतात नां होळी रे होळी पुरणाची पोळी...होळीचा सण मोठा, नाही आनंदाला तोटा. वाईट प्रवृत्तीं नष्ट व्हाव्यात त्यांची होळी करण्यासाठीच या सणाचे कोकणात मोठे महात्म्य आहे.

तळा तालुक्यातील २६ ग्रामपंचायती अंधारात

दै.रायगड नगरी । किशोर पितळे

तळा : तळा महा विज वितरणचे तालुक्यातील २५ ग्रामपंचायत व नगरपंचायत वीज ग्राहकांनी रू ३ कोटी ३६ लाख ९ हजार ३४१ थकबाकी असल्याने तालुक्यातील ग्रामपंचायतीची स्ट्रीट लाईट कट केल्याने अंधारात चाच पडावे लागत आहे. होळीचा सण जवळ आल्याने चाकरमान्यांना मोठ्या समस्या सामोरे जावे लागणार आहे. थकबाकी वसुलीसाठी महावितरणकडून कारवाई करण्यात आली आहे. सदर ग्रामपंचायतीना दिलेल्या मुदतीत बिलाची रक्कम महावितरणकडे भरणा न केल्याने महावितरणच्या वरीष्ठ कार्यालयाच्या आदेशानुसार वीज पुरवठा खंडित करण्यात आले असल्याचे तळा वितरणचे उपकार्यकारी अभियंता के डी महींद्रकर यांनी प्रतिनिधीशी सांगितले. तळा तालुक्यातील काकडशेत, गिरणे, पन्हेळीतळेगाव, मालुक, सोनसडे, बोरघर, मेढारोवळा, मांदाड, वाशी, पढवण, निगुडशेत, पिटसई, उसर, वांजळोशी चरई, रहाटाड, वरळ, मजगांव बोरीचामाळ, शेणवली, महागांव, भांनग, फळशेत, व तळा नगरपंचायत अशी एकूण ४३४३ ग्राहकांची ३ कोटी ३६ लाख ९३४१ रु.थकबाकी आहे. ग्रामीण भागातील ग्रामपंचायतीचे उत्पन्न कमी असल्याने वीज बिलाची रक्कम ग्रामपंचायतीला भरणे शक्य नसते. पुर्वी पासून पथदिवे बिल हे राज्य शासन यांच्या कडून भरले जाते.महावितरणला आर्थिक संकटाचा विचार करून वीज ग्राहकांनी थकबाकीचा भरणा करावा अन्यथा वीज खंडित केली जाईल. महावितरणला सहकार्य करावे असे आवाहन महावितरण कडून करण्यात येत आहे.

> तालुक्यातील २५ ग्रामपंचायतीची पथदिवे थकित वीजबिले भरणे बाकी असल्याचे पत्र महावितरण कडून प्राप्त झाले आहे. थकबाकी भरण्यासाठी वरीष्ठ पातळीवर पाठपुरावा केला जात आहे.
>
> **विलास यादव गटविकास अधिकारी तळा**

उरणमध्ये तालुकास्तरीय मराठी भाषा अध्ययन साहित्य निर्मिती स्पर्धा संपन्न

दै.रायगड नगरी । उरण

जिल्हा शिक्षण व प्रशिक्षण संस्था पनवेल व पंचायत समिती शिक्षण विभाग उरण यांच्या संयुक्त विद्यमाने तालुक्यातील सर्व शिक्षकांना भाषा विषयासाठी उपयुक्त ठरेल अशा कक्षाची निर्मिती करण्याच्या उद्देशाने तालुकास्तरीय मराठी भाषा अध्ययन साहित्य निर्मिती स्पर्धा आयोजित केली होती.

त्यामध्ये प्राथमिक स्तरावर प्रथम क्रमांक विकास नरहरी पाटील- भेंडखळ, द्वितीय क्रमांक शर्मिला महेंद्र गावंड -नवीन शेवे, संगीता विजय गावंड -चिरनेर यांनी मिळविले. तर उत्तेजनार्थ समाधान नामदेव पाटील-खोपटे, विश्वनाथ रा. पाटील- केगाव, तर उच्च प्राथमिक स्तर म्हणून प्रथम क्रमांक उमेश वि. पाटील, द्वितीय क्रमांक संतोष रा. म्हात्रे, तृतीय क्रमांक स्रग्धरा समिर पाटील उत्तेजनार्थ पुनम पाटील, समता ठाकूर, माध्यमिक स्तर प्रथम क्रमांक ज्योत्स्ना किशोर पाटील, द्वितीय क्रमांक लता कृष्णा ठाकूर, तृतीय क्रमांक विजय पवार उत्तेजनार्थ आशालता प्र पाटील, नामदेव सुखदेव ठाकूर यांनी मिळविले.

जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, खालील नमूद केलेली मिळकत ही श्रीमती.वंदना सोपान गावंड वगैरे २३, रा.पिसार्वे, ता.पनवेल, जि.रायगड यांचे नांवे महसूल दप्तरी आहे. सदर शेतजमीन मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे आहे.

मिळकतीचे वर्णन

मौजे : पिसार्वे, ता.पनवेल, जि.रायगड

मालक/कब्जेदाराचे नांव	सर्व्हे नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.	आकार रु.पै.
श्रीमती.वंदना सोपान गावंड वगैरे २३	६४/३ ६४/४ ६४/५ब/९	०-१८-०० ०-१५-७० ०-३२-७०	३.१२ १.५६ ४.०९

मौजे : पिसार्वे, ता.पनवेल, जि.रायगड येथील वर नमूद मिळकतीचे जमीन मालक श्रीमती.वंदना सोपान गावंड वगैरे २३, रा.पिसार्वे, ता.पनवेल, जि.रायगड यांचेकडून आमचे अशिलांनी कायमस्वरुपी नोंदणीकृत खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे.

सदर नमूद केलेल्या जमिनीच्या मिळकतीमध्ये कोणत्याही व्यक्तीचा अथवा कोणत्याही संस्थेचा गहाण, दान, बक्षिस, खरेदीखत, साठेकरार, मिळकत विकसित करणेबाबतचा करार, कुळहक्क, वहिवाटीचा हक्क, ताबा कब्जा हक्क, भाडेपट्टा, पोटगी, मृत्यूपत्र, बोजा अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांच्या लेखी हरकती, त्यांचे हरकतीतील नमूद केलेल्या हक्काबाबत प्रथमदर्शनी योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासह खालील सही करणार यांच्याकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून ७ दिवसांच्या आत प्रत्यक्ष अथवा रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावेत. याप्रमाणे मुदतीत हरकती न असल्यास सदर मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल वर नमूद केलेले जमीन मालक/कब्जेदार यांचे बरोबर ठरविलेली कायम खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील व वरील मुदतीनंतर आलेली कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम लोकांनी नोंद घ्यावी.

ठिकाण : पनवेल

दि.२०/०३/२०२१

सही/-
मयुरेश प्र.हनुमंते
ॲडव्होकेट-हायकोर्ट
शॉप नं.९, पवन अपार्टमेंट, नवीन कोर्टाचे जवळ,
लोखंडीपाडा, ता.पनवेल, जि.रायगड
मो.नं.८२८६१२१३३३

ग्रामपंचायत आकुर्ली
ता.पनवेल,जि.रायगड

दिनांक :१९/०३/२०२१

प्रती,

याव्दारे जाहीर करण्यात येते कि खालील तपशिलाचे ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी नोंद वहीतील नावात बदल करण्याबाबतचे प्रस्ताव इकडे दाखल झालेले असुन त्यात खालील प्रमाणे बदल प्रस्तावित आहेत.

अ.क्र.	भाग क्र.	स.न /प्रॉ.नं /फा.प्लॉट/ सदनिका/गाळा नं	जुने नाव	नविन नाव
१		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/०२	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार विनोद तुकरामे चांदे	शरद बाळासाहेब पाटील मयुरी शरद पाटील
२		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/२०५	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार रमेश गनपत नाचरे	रूचिरा आर तळेकर
३		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/०१	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार विनोद तुकरामे चांदे	संतोष सुदाम कांबले
४		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/१०२	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार विनोद तुकरामे चांदे	अभिजित रामदास गाडे अमितकुमार रामदास गाडे मनिषा रामदास गाडे
५		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/०३	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार विनोद तुकरामे चांदे	निधी नितिन गाडे नितिन दत्ताराम गाडे
६		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/३०८	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार विनोद तुकरामे चांदे	सतिश तुकाराम गउळकर विजया तुकाराम देवकांबळे
७		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/२०७	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार विनोद तुकरामे चांदे	आनंद कुमार झा पुजा आनंद झा
८		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/२०३	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार विनोद तुकरामे चांदे	विशाल आत्माराम मेस्त्री दिपाली विशाल मेस्त्री
९		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/१०७	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार विनोद तुकरामे चांदे	वसंत पाडुरंग पांडव स्मिता वसंत पांडव
१०		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/१०५	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार विनोद तुकरामे चांदे	महादेव सोनु काताळे वर्षा महादेव काताळे
११		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/३०३	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार विनोद तुकरामे चांदे	केशव हरिश्चंद्र नाडकर कोमल केशव नाडकर
१२		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/२०८	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार विनोद तुकरामे चांदे	शैलेश शिवाजी महाडीक बबिता शिवाजी महाडीक
१३		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/१०१	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार विनोद तुकरामे चांदे	हितेश विद्याधर गोगर
१४		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/२०१	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार विनोद तुकरामे चांदे	अंजली नरेश गोगर
१५		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/२०१	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार रमेश गनपत नाचरे	प्रांजली धर्मा तांबे
१६		एन.सी.रेसिडन्सी आकुर्ली ४०२/२०१	एन.सी.रेसिडन्सी तर्फे भागीदार रमेश गनपत नाचरे	अनिकेत प्रकाश कदम सुनंदा प्रकाश कदम
१७		पनवेल पॅराडाईज आकुर्ली ३६०/A/१०५	अशियाना रीअल्टी तर्फे भागीदार श्रेयस ए पोदार यांचे कु.मु.म्हणून वैभव चंद्रहार विभूते	अतुल अनिल साठे
१८		पनवेल पॅराडाईज आकुर्ली ३६०/B/१०३	अशियाना रीअल्टी तर्फे भागीदार श्रेयस ए पोदार यांचे कु.मु.म्हणून वैभव चंद्रहार विभूते	नारायण आर हवाळ रमाबाई आर हवाळ

वरील बाबत प्रकरण परत्वे आवश्यकतेनुसार ग्रामपंचायत आकुर्ली कर आकारणी रजिस्टरमध्ये करदात्याच्या नावात बदल करणेचे प्रस्ताव विचारधीन असुन या बाबत कोणत्याही व्यक्तीची काही हरकत असलेस सदर नोटीसीचे प्रसिध्दीचे दिनांकापासून सात दिवसाचे आत ग्रामपंचायत आकुर्ली कार्यालयात लेखी स्वरूपात दाखल करावी.वरील प्रमाणे नमुद दिलेल्या मुदतीत हरकत प्राप्त झाली नाही तर वरील प्रमाणे बदत करणेत आलेनंतर प्राप्त होणा-या तक्रारीची दखल घेण्यात येणार नाही व प्रकरण मुबंई ग्रामपंचायत अधिनियम प्रकरण ८ नियम ३२(१) नुसार कार्यवाही पूर्ण करण्यात येईल यांची कृपया नोंद घ्यावी.

सही/-
सौ.भारती सचिन पाटील
सरपंच
ग्रामपंचायत आकुर्ली

सही/-
श्री.जयेंद्र घनशाम म्हात्रे
ग्रामसेवक
ग्रामपंचायत आकुर्ली

अर्जदारतर्फे वकील ॲड.अल्हाद पिंगळे

जाहीर नोटीस

उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश क.स्तर यांच्या न्यायालयात

दि.चौ.अर्ज नं.०३/२०२०
नि.नं.८/ड
ने.ता.२५/०३/२०२१

श्रीमती.विठाबाई गणपत कडू व इतर — अर्जदार
विरुद्ध
कोणीही नाही

ज्याअर्थी अर्जदार यांनी उरण येथील मे.दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर यांच्या न्यायालयात कै.गणपत रघु कडू यांचे वारस म्हणून वारस दाखला मिळणेकरिता अर्ज दाखल केला आहे. कौ.गणपत रघु कडू हे दि.२६/०६/१९८४ रोजी मौजे : सोनारी, ता.उरण, जि.रायगड येथे मयत झाले आहेत. कै.गणपत रघु कडू यांच्या मालकीच्या व ताबेकब्जा वहिवाटीच्या मौजे : सोनारी, ता.उरण, जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकती सिडकोने संपादीत केल्या आहेत.

मिळकतीचे संपादीत वर्णन

मौजे : सोनारी, ता.उरण, जि.रायगड

गावाचे नाव / ॲवॉर्ड युनिट केस नं.	सर्व्हे नं./हिस्सा नं.
सोनारी ५६/७८	२०/४ अ

सदर मिळकतीच्या संपादनाच्या मोबदल्यात जेएनपीटी/सिडको कडून १२.५ टक्के योजनेंतर्गत भूखंड मिळणार आहेत. सदर मिळणाऱ्या भूखंडामध्ये कै.गणपत रघु कडू यांच्या मृत्यूनंतर त्यांचे नाव कमी करून सदर भूखंडावर त्यांचे वारस १) श्रीमती.विठाबाई गणपत कडू, २) श्री.नितीन गणपत कडू, १ व २ रा.सोनारी, ता.उरण, जि.रायगड ३) सौ.मनिषा नारायण म्हात्रे रा.बेलपाडा, ता.पनवेल, जि.रायगड, ४) सौ.कविता विजय ठाकूर रा.जसखार, ता.उरण, जि.रायगड हेच कायदेशीर वारस आहेत. ह्या वारसांची नावे त्याच्या जागी सिडको दप्तरी रेकॉर्ड वर येणे गरजेचे झाले आहेत. त्याकामी दिवाणी न्यायालयाकडून वारसदाखल्याच्या निवाडा जाहीर करून घेणे गरजेचे व आवश्यक झालेले आहे. सदर कारणाकरिता अर्जदार यांनी मे.दिवाणी न्यायालयात वारस दाखला मिळण्याकरिता सदरचा दि.चौ.अर्ज क्र.०३/२०२० अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सदर मिळकतीचे वारस हक्काबाबत कोणाचीही हरकत अधिकार अथवा वारस असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून दिवसांच्या आत या न्यायालयात हजर राहून हरकत कळवावी. वरील मुदतीत हरकत न आल्यास नोटीसीच्या मुदतीनंतर अर्जदार यांचे नावाने वारस दाखला दिला जाईल. मात्र मागाहून कोणाचीही हरकत किंवा तक्रार ग्राह्य धरली जाणार नाही.

आज तारीख ११/०३/२०२१ रोजी माझ्या सही शिक्क्यानिशी दिली.

सही/-
क.लिपीक
दि.न्या.क.स्तर, उरण

कोर्टाचा शिक्का

सही/-
सहा.अधिक्षक
दि.न्या.क.स्तर, उरण

जाहीर नोटीस

जाहीर सूचना देण्यात येत आहे की, माझे अशिल यांनी अंदाजे एकूण **क्षेत्र ७२१० चौ.मी. पैकी १८८९ चौ.मी.**चा भूखंड की जो सिडको लि.कडून **मौजे : पुष्पक नोड, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड** येथे वाटप होणार आहे, तो खरेदी केला आहे. हा सदरचा भूखंड ज्यांना वाटप होणार आहे त्यांची नावे अशी आहेत. **१) सौ.निराबाई एकनाथ पाटील** रा.तळोजा मजकूर, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड, **२) सौ.जानुबाई उर्फ जना मोहन पावशे** रा.मु.बामाल्ली, पो.बाकलन, मुंब्रा-पनवेल रोड, जिल्हा ठाणे, **३) सौ.कांता उर्फ शर्मिला पद्माकर मोकल,** रा.मु.साई तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड (यापुढे संक्षिप्ततेसाठी **''मुळ मालक''** असा उल्लेख केला आहे.) यांना हे भूखंड वाटप सिडको लिमिटेडने नवी मुंबई येथे आंतरराष्ट्रीय विमानतळासाठी युनिट केस क्रमांक १३७, १३८ आणि १३५ द्वारे संपादीत केलेल्या जमिनीच्या मोबदल्यात असून ते २२.५ टक्के गावठाण विस्तार योजनेंतर्गत वितरित होणार आहेत. सदर संपादीत जमिनीचे वर्णन खालीलप्रमाणे :

सदरहू संपादीत मिळकत

मौजे : ओवळे, तालुका : पनवेल, जिल्हा : रायगड

अ.क्र.	युनिट केस क्रमांक	सर्व्हे नंबर/ हिस्सा नंबर	क्षेत्र हे.आर.पॉ.
१	१३८	४०/५+८	०-९३-००
२		१३३/३	०-४५-७
३		१३८/५	०-२१-०
४		१६१/०	०-२८-८
५	१३५	१६२/०	०-१२-४
६		१६३/१० ब	०-२५-५
७		१६३/८/२ ब	०-२०-०
८		१६७/१	०-२०-७
९		३६/६	०-४८-४
१०		४०/१९	०-३५-००
११	१३७	१४७/१	०-३२-०
१२		१४८/६	०-५७-४

कोणाही व्यक्ती किंवा अनेक व्यक्ती, कंपनी, कार्यालय यांचा सदर भूखंडासाठी किंवा त्यावर त्याच्या भागावर विक्री, गहाणवट, लिअन, भेट किंवा अन्य कोणत्याही प्रकारे हक्क असेल तर त्याच्या पुष्ट्यर्थ त्यांनी अशा हक्काबाबत / हरकतीबाबतची सूचना त्यात हक्क / हरकतीचे स्वरुप यांची माहिती अन्य तपशिलासह की जो पुरावा म्हणून पुरेशी ठरेल तसेच कागदोपत्री पुरावा खाली सही करणाऱ्याकडे त्याच्या कार्यालयात ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून **१४ दिवसांच्या** आत सादर करावी आणि जर तसे केले नाही तर असे गृहीत धरण्यात येईल की, सदर भूखंडा हा सर्व प्रकारच्या बंधनातून आणि अन्य हक्कापासून आणि अधिकारापासून किंवा अन्य प्रकारच्या बंधनापासून मुक्त असेल आणि तसे जर काही हक्क असतील तर ते सोडून देण्यात आले आहेत असे मानण्यात येईल आणि माझे अशिल कोणतेही हक्क, हरकती आल्याच तर त्याचा विचार न करता सदर भूखंड खरेदी करण्याच्या दृष्टीने दिलेली मुदत संपल्यानंतर कार्यवाही करेल.

दि.१९/०३/२०२१

सही/-
ॲड.कालिदास सु. पोटे
ऑ-३८, अरेंजा कॉर्नर,
से.१७, वाशी, नवी मुंबई

संक्षिप्त...

सिद्धेश्वर आदिवासीवाडी शाळेत स्वच्छ पाणी सुविधा व शौचालय नूतनीकरणाचे उद्घाटन

दै.रायगड नगरी । पाली/बेणसे

सुधागड तालुक्यातील राजीप शाळा सिद्धेश्वर आदिवासीवाडी येथे स्वदेस फाउंडेशन व स्मार्ट स्ट्रीम टेक्नॉलॉजी त्यांच्या वतीने स्वच्छ पाणी सुविधा व शौचालय नूतनीकरणाचे उद्घाटन नुकतेच करण्यात आले आहे. प्रांत अधिकारी यशवंत माने व तहसीलदार दिलीप रायन्नावार यांच्या हस्ते हे उद्घाटन करण्यात आले आहे.

यावेळी सिद्धेश्वर ग्रामपंचायतीचे सरपंच उमेश यादव व त्यांचे सर्व सहकारी स्वदेस फाउंडेशन ची टीम सिद्धेश्वर आदिवासी वाडीतील ग्रामस्थ उपस्थित होते. या उपक्रमामुळे आता आदिवासी वाडीवरील मुलांना स्वच्छ पाणी व स्वच्छतागृह उपलब्ध होणार आहे. त्यामुळे मुलांचे आरोग्य सदृढ व निरोगी राहील असे उमेश यादव यांनी यावेळी सांगितले. तसेच या उपक्रमाबद्दल सर्वांचे आभार देखील मानले.

उरण शहराचा पाणी पुरवठा तीन दिवसानंतर पूर्ववत

दै.रायगड नगरी । उरण

उरण शहराला पाणी पुरवठा करणाऱ्या रानसई धरणाची पाईपलाईन चिरले गावाजवळ फुटली होती. त्यामुळे पाणी पुरवठा खंडित झाला होता. तो आज ३ दिवसानंतर पूर्ववत करण्यात आले आहे. यामुळे शहरातील जनतेने सुटकेचा निःश्वास सोडला.

रानसई धरणाची पातळी वाढत्या उष्णतेमुळे कमी होत चालली आहे. त्यामुळे उरण शहरात मंगळवार व शुक्रवार या दोन दिवशी पाणी पुरवठा बंद असतो. त्यामुळे मंगळवारी पाणी पुरवठा बंद होता. परंतु त्याच दिवशी दुपारी चिरले गावाजवळ पाईपलाईन फुटली होती. यामुळे धरणातून होणारा पाणी पुरवठा खंडित करण्यात आला होता. सदरची पाईपलाईन खोलवर असल्याने दुरुस्तीसाठी खोदकाम करण्यास विलंब होत होता. यामुळे मंगळवारी फुटलेली पाईपलाईन दुरुस्त करण्यासाठी बुधवार व गुरुवार हे दोन दिवस लागले. त्यामुळे उरण शहरात मंगळवार ते गुरुवार पर्यंत पाणी पुरवठा न झाल्याने नागरिकांच्या घरात पाणीच राहिले नसल्याने पाण्यासाठी वणवण करावी लागत होती. काहींनी पाणी हवे म्हणून सोसायटीत भाड्यांनी पाण्याचे टँकर आणले तर नगरपालिकेनेही टँकरद्वारे पाणी पुरवठा सुरू ठेवला होता. पण तरीही पाणी पुरवठा कमी पडत होता. शिवसेना जिल्हाप्रमुख व माजी आमदार मनोहरशेठ भोईर व उरण नगरपालिकेतील शिवसेना गटनेते गणेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली उरण शहराच्या ज्या विभागात पाणी पुरवठा होत नाही त्या सर्व विभागात शिवसेनेतर्फे मोफत टँकरने पाणी पुरवठा केले जात आहे. सेनेचे नगरसेवक अतुल ठाकूर हे स्वतः पाण्याचा टँकर घेऊन उरण शहराच्या सर्व विभागात जाऊन नागरिकांसाठी पाण्याची व्यवस्था करत आहेत.

म्हसळा तालुक्यात कोरोनाचे नियम पाळत होलिकोत्सवास सुरुवात

दै.रायगड नगरी । उदय कळस

म्हसळा : आज फाल्गुन शुद्ध पंचमी आज कोकणात पहिली होळी, शिमगोत्सवास प्रारंभ उत्तर कोकणातीत म्हणजेच रायगड जिल्हातील म्हसळा या तालुक्यातील आज पासून पुढील १२ दिवस जणू दिवाळी दसरा, बारा दिवस १२ होळ्या ग्रामदेवतांच्या पालख्यांनी लगबग, दर्शनासाची झुंबड, शंकसुरचा मार, गोमुचा नाच, शिमग्यातील सोंग जणू काही आनंदाची पर्वणीच शिमगा आणि गणपती हे कोकणी माणसांच्या अत्यंत जिव्हाळ्याचे विषय आज पर्यंत अनेकांनी माझ्या नावाने शिमगा करू नको हा शब्दप्रकार नक्की ऐकला असेल पण शिमगा करू नको म्हणजे नक्की काय हे कोकणाच्या लाल मातीत जन्माला आल्याशिवाय करणार नाही. हिंदू संस्कृती ही व्यक्तीहा प्रत्येक समाजाला एक आदर्श देणारी आहे.सृष्टी निर्माण रचल्यापासून गेली गेली अनेक शतके सणाची चाललेली परंपरा आज हि अबादी आहे परंतु सदयाच्या कोरोंना कालावधी मध्ये हि असलेली संस्कृती जतन ठेवण्यासाठी शासन काही प्रामाणिक प्रयत्न करेल का? हे देखील पाहणे तितकेच महत्वाचे आहे. कारण कोरोंनाचा प्रादुर्भाव झपाट्याने वाढत आहे त्या अनूषंगाने या वर्षीचा शिमगा शांतेतेत व भारतीय संस्कृती व परंपरेला धरून करणे गरजेचे आहे.

श्रावण महिन्यामध्ये जी सणाची चाहूल सुरु होते. त्यातील नागपंचमी, रक्षाबंधन, गोपाळकाला, गणपती, नवरात्र, दिवाळी मकरसंक्रांती, अशा

सणाची चाहूल लागता त्यातील सर्वात मोठा सन म्हणजे होळी. कोकणातील विशेष दक्षिण विभागात शिमगा सणाला विशेष महत्व प्राप्त असतो. कारण सर्व सणापैकी शिमगा हा सन खूप दिवसांचा असतो.यावर्षी आज पासून पहिल्या होळीला सुरुवात झाली. गाव वस्ती खेडी शहर यांच्यामध्ये पहिल्या होळीपासून भक्तीचा मळा सजला जातो ह्या सणांमध्ये होळी शिमगा म्हणजे कोकणवासीयांचा हौसैमौजेचा सण याच काळात सर्वच लोक आपल्या मुक्कामी येऊन होळी ची परंपरा राखत गावोगावी आपल्या देवाची पालखी, नाच, थेर बोरकी,नकवा, कृष्णाराधेचा असे विविध नाच आपल्या गावातील लोक एकत्र घेऊन नाचत असतात आपल्याला असणारा देवासंदर्भात भाव गीतामधून व्यक्त करून शिमगा सणाचा आनंद साजरा करतात. मात्र या वर्षी हा उत्सव शासन निर्णयानुसार ठराविक भक्तामध्ये केला जाणार आहे. सध्या वस्तु स्थिती मात्र वेगळी आहे. पूर्वीचा शिमगा आणि आताचा शिमगा या मध्ये मात्र वेगळा स्वानुभव निर्माण झाला आहे. आताचे तरुण केवळ आपल्या मोबाईल मध्ये व्यस्त असल्याने होळी शिमगा सणाकडे विशेष लक्ष देत नसल्याचे दिसत आहे. असे जरी असले तरी म्हसळा तालुक्यात मात्र होळी शिमगा सणाची परंपरा राखण्याचे कार्य म्हसळा तालुक्यातील केलटे गावामध्ये केले जात आहे. अनेक शतके सुरु असणारा थेर बोरकी नाचाची खेळी आज लहान चुमुकळी करत आहेत ईश्वराच्या अवतारात लाल वस्त्राचे परिधान करून गावोगावी जाऊन रामायन गीताची उभारणी करून राम सिताचे गुण गांन गाईले जातात. घरातील बहीण भाऊ यांची नावाजणी (नावावरती जन्मा पासून सासरी अशी येवढ्या काळावधीत आपला पाठीराखा भाऊ आपली सेवा कशी करतो माहेरच्या घरात जन्माला आल्या पासून आपल्या सासरच्या घरात राहण्याचा अवधी असे पर्यत कशी जगते याचा संपूर्ण दर्शन त्या गीतातून केला जातो) हि थेर बोरकीची परंपरा आज पाहता कमी होत चालली आहे ही परंपरा सुरु राखण्याचे काम आज काहि भाविक करत आहे. जे खेळी गेले असतात ते होम लावण्याच्या आदल्या रात्री आपल्या गावी येतात. होळी सण हा.फाल्गुन महिन्यात येणारा शिमगा उत्सव शेतकरी वर्गाच्या निवांत काळात येतो. शेतीची कामे संपलेली असतात. शेतीची भाजवणी करून ठेवलेली असते. आता पेरणीच्या काळापर्यंत म्हणजे ६७ जून पर्यंत (रोहिणी नक्षत्र) विश्रांतीचा काळ असतो. त्यामुळे हा काळ कोकणात विशेष आनंदात शिमगा उत्सव साजरा करण्यासाठी वापरला जातो. जाती, धर्म, पंथ ह्या सगळ्या गोष्टी बाजूला ठेऊन सर्व नागरिक एकत्र येऊन होळी सन अगदी आनंदाने साजरा करत असतात. यावर्षी २८ मार्चला मोठी होळी साजरी करण्यासाठी मुंबईतील चाकरमनी गावाकडे जर येणार नसले तरी तो आनंद मात्र तसाच तेवत आहे. मोठी होळीसाठी सकाळपासून प्रत्येक गावातील लोकं होळीसाठी असणारी सामग्री जमा करण्यासाठी आनंदाने एकत्र येत असतात. सायंकाळी ४ नंतर होळी रचण्याचे काम सुरु करतात. त्यानंतर सायंकाळी त्या होळीची पूजा करण्यासाठी गावचे वतनदार पाटील हे त्या होळीची संपूर्ण गावाला घेऊन पूजा करतात. त्याअंती त्या होळीला नैवद्य दाखवत होळीच्या गोळ फिरून ईश्वराचे भजन (फाक) बोलले जाते. फाकामध्ये ३३ कोटी देवांची नावे घेतली जाते. राम, लक्ष्मण यांची स्मरण केली जाते. होळीला अखेर नमस्कार करत होळी लावली जाते. दुसऱ्या दिवशी धुळी वंदनाचा कार्यक्रम मोठ्या उत्साहाने साजरा केले जाते. वेगवेगळे प्रकारचे रंग आणून कार्यक्रमाचा आनंद लुटत असतात. होळीचे हे चार दिवस एकदम आनंदाने जातात वेगवेगळी कार्यक्रम माणसांची गावात होणारी गर्दी अशाने होळीचे दिवस संपून ५ व्या दिवशी होळी शिवलवली जाते . काही ग्रामीण भागात होळी सासरी जाताते अशी देखील बोलले जाते.

रायगड जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदी मनोहरशेठ भोईर

दै.रायगड नगरी । उरण

उरण विधासनसभेचे माजी आमदार व जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर यांची रायगड जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदी निवड झाली आहे.

जिल्हा परिषद सदस्य ते जिप उपाध्यक्ष माध्यमातून विकास कामे केली. त्याची पोचपावती म्हणूनच जनतेने त्यांना उरण विधानसभेचे आमदार म्हणून निवडून आणले. आमदार असताना मनोहरशेठ भोईर यांनी अनेक विकासकामांवर जोर देऊन ते मार्गी लावले. या निवडणुकीत जरी त्यांना पराभवाचा सामना करावा लागला तरी मनोहरशेठ भोईर यांनी आपले समाजकारणाचे कार्य सुरुच ठेवले आहे.

माजी आमदार व जिल्हाप्रमुख मनोहरशेठ भोईर यांनी साहित्य, कला, संस्कृती व क्रीडा क्षेत्रातील मंडळींबरोबर आपला स्नेहभाव कायम जपला. प्रसंगी अनेकांना मदतीचा हात दिला. ही बाब मराठी माणसांसाठी निश्चितच भूषणावह आहे. म्हणूनच त्यांचे 'कार्य व कर्तृत्व' विचारात घेऊन महाराष्ट्र शासनाने उरण विधानसभा मतदार संघातील शिवसेनेचे माजी आमदार, जिल्हा प्रमुख, रायगड जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष, मनोहरशेठ भोईर यांची रायगड जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदी नियुक्ती केली आहे. रायगड जिल्हा नियोजन समितीच्या सदस्यपदी मनोहरशेठ भोईर यांची निवड जाहीर होताच त्यांच्यावर उरण विधानसभा मतदारसंघातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

पूर्व वैमनस्यातून बनोटी येथील तरुणाने केली वृद्धाची हत्या

दै.रायगड नगरी । म्हसळा

म्हसळा तालुक्यातील बनोटी गावातील गोविंद नागू नाक्ती वय ६८ रा.बनोटी यांची पूर्ववैमनस्य व किरकोळ वादातून शेजारी असणाऱ्या यशोधन भरत गाणेकर वय२०या युवकाने हत्या केल्याची घटना काल दिं.१७ रोजी घडली. सदर घटनेची नोंद फिर्यादी भाऊ नामदेव नाक्ती याने म्हसळा पोलीसांत दिल्याने गु.र.नं १५ /२०२१ भादवी३०२, ३२४,

५०४, ५०६ प्रमाणे करण्यात आली आहे. यशोधन याला त्याच्या वर्तणुकीबाबत मयत गोविंद याने समज दिल्यामुळे त्याच्या मनात आलेल्या क्रोधामुळे यशोधन याने टोकाची भूमिका घेतली असावी अशी चर्चा आगरी पट्ट्यांत आहे. गोविंद याला यशोधन ने लाकडी दांडक्याने केलेल्या मारहाणीत तो प्रथम गंभीर जखमी व नंतर उपचाराला नेत असताना मृत झाल्याचे समजते.घटनेचा तपास स.पो.नी. धनंजय पोरे करीत आहेत.घटनेचे गांभीर्य पहाता श्रीवर्धनचे प्रभारी टी.एस.पाटील यानी घटना स्थळी भेट दिल्याचे सांगण्यात आले.

पनवेल महानगरपालिका
शहर अभियंता विभाग
जाहिर ई-निविदा सूचना

निविदा सूचना क्र.पमपा/श.अ./५१६/२०२१ दिनांक : १९/०३/२०२१

आयुक्त पनवेल महानगरपालिका खालील नमूद कामांकरिता सार्वजनिक बांधकाम विभाग, केंद्रीय सार्वजनिक बांधकाम विभाग, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, सिडको इत्यादी शासकीय विभागात योग्य त्या वर्गात नोंदणीकृत पात्र अनुभवी ठेकेदारांकडून बी-१ शतमान पद्धतीनुसार जाहीर ई-निविदा मागवित आाहेत.

अ.क्र.	निविदा क्र.	कामाचे नाव	निविदा रक्कम (Without GST)
१	PMC/CE/31/20-21	पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क. प्रभाग क्र.१४ मधील अं.भू.क्र.१८ ते सर्वे नं.७९७ (पनपा पाण्याची उंच टाकी ते गणेश मंदिर ते ला-मेर कॉम्प्लेक्स) साई नगर रस्ता काँक्रीटीकरण करणे.	१०,०६,९८,९२२/-
२	PMC/CE/32/20-21	पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड प्रभाग क्र.१९ मधील अं.भू.क्र.२६१ मधील मच्छि मार्केट व पार्कीग मधील रस्ता काँक्रीटकरण करणे व पार्कीग क्षेत्रातील जमिनीची उंची वाढविणे	१,२६,१२,१९६/-
३	PMC/CE/33/20-21	पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड प्रभाग क्र.१९ मधील कृष्णाळे तलाव लगतचा (डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील पुतळ्यापासून ते बालाजी मंदिर ते कर्नाळा सर्कल पर्यंत) व सहयोग नगर मधील टी आकाराचा रस्ता काँक्रीटीकरण करणे	२,९२,६२,९५६/-
४	PMC/CE/34/20-21	पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती क प्रभाग क्र.१४ मधील आदेश को.ऑ.हौ.सोसा. लि. व पनवेल को.ऑप.हौ.सोसा. मधील अंतर्गत रस्ते व अं.भू.क्र.३५ ते किनारा सोसायटी पर्यंतचा रस्ता डांबरीकरण करणे	४,३७,११,६७२/-
५	PMC/CE/35/20-21	पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग समिती ड प्रभाग क्र.१९ मधील अं.भू.क्र.१२७ अ ते १२४/२ ते अं.भू.क्र.१३९ ते म्हात्रे हॉस्पिटल ते अं.भू.क्र.१४२ व श्री.कोटी भास्कर (वृदांवन हॉटेल) ते काळे ह्यांच्या घरापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	१,७४,७९,०४८/-
६	PMC/CE/36/20-21	पनवेल महानगरपालिका हद्दीतील पनवेल प्रभाग क्र.१९ मधील टिळक रोड ते महात्मा फुले मार्गाला तथास्तू हॉल समोरील रस्त्यामध्ये दोन्ही बाजूस गटर बांधणे व रस्ता डांबरीकरण करणे	५२,३९,६८७/-
७	PMC/CE/61/20-21	प्रभाग समिती ड प्र.क्र.१८ मधील छत्रपती संभाजी महाराज मैदान विकसित करणे (प्रॉ.क्र.४३६)	३,८८,३६,६९२/-
८	PMC/CE/37/20-21	प्रभाग समिती ड प्र.क्र.१८ मधील महानगरपालिका अग्नीशमन केंद्र इमारत ते डॉ.मौलाना आझाद केंद्रापर्यंत रस्ता डांबरीकरण करणे	३०,९१,४३९/-
९	PMC/CE/62/20-21	प्रभाग समिती ड प्र.क्र.१९ मधील अं.भू.क्र.२६१ (पार्ट) मच्छि मार्केटचे पत्रे बदलणे व फॉल सिलींग करणे	४५,४३,२५५/-
१०	PMC/CE/64/20-21	पनवेल महानगरपालिका हद्दीतील प्रभाग क्र.१९ मधील उरण रोड येथील श्री संताजी महाराज जगनाडे चौक ते लक्ष्मी आय इन्स्टिट्यूट पर्यंत आर.सी.सी. नाला बांधणे	१,३२,६०,१२९/-
११	PMC/CE/65/20-21	प्रभाग समिती ड प्र.क्र.२० मधील पोदी भागामध्ये मलःनिस्सारण वाहिन्या टाकणे	९२,३४,१३३/-
१२	PMC/CE/66/20-21	प्रभाग समिती ड प्र.क्र.२० मधील पोदी भागामध्ये अंतर्गत गटाराचे बांधकाम करणे	९३,७२,०८१/-
१३	PMC/CE/67/20-21	प्रभाग समिती ड, प्र.क्र.२० मधील तक्का गाव येथे मलःनिस्सारण वाहिन्या टाकणे	१,१९,१९,३८९/-
१४	PMC/CE/68/20-21	प्रभाग समिती ड, प्र.क्र.२० मधील तक्का गाव येथे अंतर्गत गटाराचे बांधकाम करणे	१,१६,८६,५१६/-
१५	PMC/CE/69/20-21	प्रभाग समिती ड, प्र.क्र.२० मधील काळुंद्रे येथे मलः निस्सारण वाहिन्या टाकणे	८८,७५,३०५/-
१६	PMC/CE/70/20-21	प्रभाग समिती ड, प्र.क्र.२० मधील भिंगारी गावामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी गटाराचे बांधकाम करणे	८३,८९,३८९/-
१७	PMC/CE/71/20-21	प्रभाग समिती क, प्र.क्र.१४ मधील लेंडाळे तलावाचे सुशोभिकरण करणे	२,५१,८५,६९८/-
१८	PMC/CE/55/20-21	प्रभाग समिती क, प्र.क्र.१६ मधील नवीन पनवेल (पूर्व), सेक्टर ११ मधील भू.क्र.२८ येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रिकेट प्रशिक्षण केंद्र (ॲकॅडमी) विकसित करणे	७,९४,२६,७०३/-

या कामाच्या ई-निविदे बाबतची माहिती शासनाच्या http://mahatenders.gov.in या संकेतस्थळावर दि.२२/०३/२०२१ रोजी प्रसिद्ध करण्यात येईल. संबंधित निविदाधारकांनी याची नोंद घ्यावी.

सही/-
(तृप्ती सांडभोर)
अतिरिक्त आयुक्त
पनवेल महानगरपालिका

सावधान.. खारघरवासीय खातात विषारी भाजी....

सांडपाण्यावर भाजीची पैदास ; कारवाई करण्याची मागणी

दै.रायगड नगरी । संजय कदम

पनवेल : खारघरकरानो इथून पुढे बाजारात मिळणाऱ्या पालेभाज्या जरा जपूनच खाण्याची आवश्यकता सध्या निर्माण झाली आहे. कारण खारघर येथील सेक्टर ९ जवळील रेल्वे रुळालगत बहुतांश स्थानकांलगत पिकणाऱ्या पालेभाज्या या गटाराच्या पाण्यावर पिकविण्यात येत असून त्या किरकोळ विक्रेते अथवा हॉटेलचालकांना विकण्यात येत आहेत. गटरातील सांडपाण्यातील रासायनिक पदार्थामुळे या भाज्या आरोग्याला हानीकारक असून रेल्वेने तसेच सिडकोने भाजी पिकवणारे गटाराचे पाणी वापरताना आढळल्यास त्यांच्यावर कारवाई करावी, अशी मागणी खारघरचा राजा गणेश चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष विजय पाटील यांनी केली आहे.

खारघर रेल्वेस्थानक मुंबई उपनगरी रेल्वेच्या हार्बर मार्गांवरील तिसरे स्थानक आहे. नव्याने व वेगाने विकसित होणारे भूभाग म्हणून खरघरमधील बांधकामे दिवसेंदिवस वाढत आहेत. त्यातच खारघर येथील सेक्टर ९ च्या जवळील रेल्वेच्या रुळालगत बाजूनेच जाणाऱ्या सांडपाण्याचा वापर भाजी पिकविण्यासाठी येथील काही भाजी विक्रेते करणाऱ्यानी व्यवसाय थाटला आहे. याठिकाणी छोटे- छोटे वाफे करून

पालेभाज्या पिकवण्यात येतात. यात पालक, चवळी, भेंडी, लाल माठ, माठ आदी भाज्यांचा समावेश आहे. मात्र, या पालेभाज्या पिकविण्यासाठी रेल्वे रुळांलगत असलेल्या गटारातील सांडपाण्याचा वापर करण्यात येत असल्याचे निदर्शनास आले आहे. या सांडपाण्यामध्ये असलेल्या रासायनिक पदार्थामुळे या भाज्यांचे सेवन करणाऱ्यांच्या आरोग्यावर विपरीत परिणाम होत असल्याची चिंता काहींनी व्यक्त केली आहे. या भाज्यांमुळे पोटाचे व शरीरावर दूरगामी परिणाम करणारे गंभीर आजार होण्याची भीतीही व्यक्त करण्यात येत आहे. या भाज्या रेल्वेच्या व सिडकोच्या हद्दीतील जमिनींवर पिकविण्यात येत आहे. सिडकोचा या प्रकाराकडे दुर्लक्ष होत आहे. हीच विषारी भाजीपाला खारघर शहरात विक्री करीता ठेवला जात असल्याने भाजीपाल्याच्या रुपाने खारघरवासीय विषारी भाजी खात आहेत. यामुळे खारघर वासियांच्या जीविताला धोका निर्माण झाला आहे. त्यामुळे या भाजी पिकविणारे व विक्री करणाऱ्यांवर कारवाई करण्यात यावी अश्या मागणीचे पत्र खारघरचा राजा गणेश चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष विजय पाटील यांनी सिडकोला दिली असल्याची माहिती पाटील यांनी दिली आहे. रेल्वे रुळांलगत पिकविण्यात येणाऱ्या भाज्यांसाठी वापरण्यात येणाऱ्या सांडपाण्याच्या पाण्यात मोठ्या प्रमाणावर लेड, आर्सेनिक, मक्र्युरी आदी जड धातूंचा समावेश असतो. पाण्यातील या धातूंवर पिकवलेल्या भाज्या खाल्ल्यास त्याचे शरीरावर गंभीर परिणाम होऊ शकतात. अशा भाज्या कच्च्या खाल्ल्यास तात्काळ पोटाचे विकार उद्भवू शकतात. या भाज्या खाण्यापूर्वी नीट धुऊन न घेतल्याने नागरिकांचे आरोग्य धोक्यात येऊ शकते. असे मत काही आहार तज्ञानी व्यक्त केले आहे.

चिमणीची ओळख नव्या पिढीला असायला हवी जागतिक चिमणी दिनानिमित्त इतकेच

दै.रायगड नगरी । उरण

जीवसृष्टी ही निसर्ग नियमावर आधारित आहे, आणि निसर्गातील प्रतेक सजीव प्राणी वनस्पती, जलचर प्राणी, सरपटणारे प्राणी, पशु-पक्षी आणि मनुष्य प्राणी हा निसर्गाचा अविभाज्य भाग आहे. या सर्वांचे जीवन एकमेकाचा सहकार्याने पृथ्वीवर सुरु असते, परंतु अलिकडे मानवाने निसर्गातील पर्यावरणाचे चक्र बदलण्याचा प्रयत्न सुरु केल्याने अन्य प्राण्यांची कोंडी झाली आहे.

पूर्वी भल्या पहाटे कोंबडा अरवल्यावर पहाटे परसबागेत होणारा चिमण्यांचा चिवचिवाट आता ऐकू येत नाही कारण आता मानवाने केलेल्या पर्यावरणाच्या ऱ्हासामुळे हा पहाटेचा पक्षांचा किलबिलाट नाहीसा होऊन याची जागा रेडीओ वरील गाण्यांनी घेतली आहे. आज २० मार्च जागतिक चिमणी दिन पर्यावरणाच्या ऱ्हासा मुळेच आज जगभरात हा दिवस साजरा केला जात आहे.

पूर्वी पहाटेच्या काळी परसबागेतील झाडांवरून आणि घराचा आजूबाजूला असण्याऱ्या झाडांवर रात्री मुकामाला असणाऱ्या चिमण्या व कोंबड्या अरवण्याने आपला सुरु केलेला किलबिलाट आजीने मुठभर टाकलेल्या तांदुळाच्या कण्या खाऊन शांत झाल्यावर आपल्या हक्काचा शेर मिळाला त्यामुळे आजचा दिवस निशितच चांगला जाईल या भावनेने उंच आकाशात भरारी घेत दिवस भरच्या शोध कार्याला सुरवात करत होत्या.

प्रतेक घराघराचे चिऊताई बरोबर जणू हक्काचे ऋणानुबंध होते आणि चिऊताईने ही आपापल्या पारस बागेच्या वाटण्या करून घेतल्या होत्या. हे नाते इतके घटे होते जर या चिऊताई दिसल्या नाहीत तर आजी पासून घरातले सर्व काळजीत पडायचे सायंकाळी त्या घरी परतल्या की नाही, याकडे बारकाईने लक्ष ठेऊन असायचे. आजी हमखास नातवांना चिऊताई च्या गोष्टी संगायची तर आई चिऊताई दाखवीत लहानग्याला खाऊ-पियू घालायची, पण आज चिऊताई ने घरासी जोडलेले नाते पूर्ण पणे तुटले आहे.

आज केवळ चिऊताईचा एखादा फोटो दाखवून आईला बाळाची समज घालावी लागते. याचे कारण मानवाने पृथ्वीवर सुरु केलेला निसर्ग पर्यावरणाचा ऱ्हास याला कारणीभूत आहे. आज केवळ चिमण्याच दिसत नाही, तर त्याच्या अनुषंगाने अनेक लहान-लहान पक्षी दिसेनासे झालेत यातच इमारतींना लावलेल्या काचेच्या तावदानामुळे त्याच्यावर आपटून अनेक चिमण्या मृत्यूमुखी पडल्या आहेत.

तर नैसर्गिक अन्नात घट झाल्यामुळे कधी काळी एकाच झाडावर वास्तव्याला असणाऱ्या चिमण्या कावळे, घारी, ससाणे, घुबड, या पक्षांच्या भक्ष्यस्थानी पडत आहेत. एकंदरीत आज पारसबागेत हक्काने वास्तव्य करतांना आणि आजीकडे हक्काने खाऊ म मागतांना दिसणारी चिमणी पारसबागच नाहीसी झाल्याने आणि आजू-बाजूच्या घरा शेजारील झाडांची कत्तल झाल्याने आता दिसेनासी झाली, पण या चिमणीलाही जगण्याचा अधिकार आहे तो अधिकार मानवाने स्वतःच्या स्वार्थासाठी हिराऊन घेतला. आज २० मार्च या जागतिक चिमणी दिना निमित्त इतकेच, चिमणीची ओळख आजच्या नव्या पिढीला असायला हवी.